

PRECISION
FOUNDATION

# ई लर्निंगचा
# प्रिसिजन
# पॅटर्न

PRECISION FOUNDATION

# ई लर्निंगचा

# प्रिसिजन

# पॅटर्न

PRECISION FOUNDATION

**खाजगी वितरणासाठी**

प्रकाशक

**प्रिसिजन फाऊंडेशन**

संकलन

**प्रा. विलास बेत**

**माधव देशपांडे**

**प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेड,**
डी ५, एमआयडीसी चिंचोळी,
सोलापूर. ४१३ २५५
संपर्क क्रमांक : ९१६८६४६५३१/३२/३३



व्यक्तिमत्व घडविणारे, मनाची शक्ती वाढविणारे,
बुद्धीच्या कक्षा रूंदावणारे, प्रत्येकाला त्याच्या स्वतःच्या
पायावर उभे करणारे शिक्षण आम्हाला हवे आहे.

**– स्वामी विवेकानंद**



**यतिन शहा**

चेअरमन,

प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लि., सोलापूर

**शिक्षण, आरोग्य, सामाजिक प्रश्न, शाश्वत विकास आणि कला व संस्कृती या पाच क्षेत्रांमध्ये प्रिसिजन समूह कायमच कार्यरत राहणार आहे. वरवरची दुरूस्ती न करता एखाद्या प्रश्नावर कायमचा इलाज शोधण्याचाच आमचा प्रयत्न असेल.**

# व्यवसायासोबतच सामाजिक बांधिलकीचेही भान

**ज्या** समाजात आपण राहतो त्याचं आपण काहीतरी देणं लागतो. याच भावनेनं ज्या सोलापुरात प्रिसिजन कंपनी मोठी झाली त्या सोलापूरकरांच्या जीवनात बदल घडविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्वाची जबाबदारी पार पाडण्यासाठी २००६ साली प्रिसिजन फाऊंडेशन ही विश्वस्त संस्था सुरू झाली. दहा वर्षांच्या वाटचालीनंतर आम्हाला आता सामाजिक कार्यही वाढवायचं आहे. व्यवसाय करत असतानाच प्रिसिजनला सामाजिक बांधिलकीही जपायची आहे.

नफा कमावणे हा कोणत्याही उद्योगाचा हेतू किंवा उद्दिष्ट असते. याच उद्देशाने चांगली माणसे एकत्र येतात आणि मेहनत करून व्यवसाय करतात. सामूहिक प्रयत्नांच्या बळावरच कोणतीही संस्था पुढे जात असते. मात्र स्वतःची प्रगती करत असतानाच समाजातील गरीब व गरजू व्यक्तींनाही मदत करायला हवी, हीच प्रिसिजनची सुरवातीपासूनची भावना आहे.

त्यामुळेच कंपनीने आपल्या नफ्यातील काही हिस्सा खर्चून समाजासाठी हितकारक उपक्रम राबविले व यापुढेही राबविणार आहे. रोजच्या जगण्यात आपल्याला अवतीभवती अनेक प्रश्न दिसतात. वेगवेगळ्या समस्यांनी सामान्य लोकांचे आयुष्य त्रासून गेलेले असते. हे चित्र बदलण्यासाठी त्यांना छोटीशी मदतही पुरेशी असते. लोकांच्या अशाच गरजा, अडचणी ओळखून त्या दूर करण्याचा प्रयत्न आम्ही प्रिसिजन फाऊंडेशनच्या माध्यमातून करत आहोत.

हे सगळं करण्यासाठी अक्षरशः शेकडो लोकांनी आपापल्या परीने मदत केली आहे. प्रिसिजनचे कर्मचारी घाम गाळून ग्राहकाला संतुष्ट करतात. नवनवीन ऑर्डर्स मिळवतात, नफा कमावतात. त्यामुळेच सामाजिक कार्यासाठीचा मोठा निधी उभा राहू शकतो. त्यामुळे अप्रत्यक्षरित्या का होईना, त्या सर्वांचा या सामाजिक कार्यात फार मोठा वाटा आहे. त्याचप्रमाणं वेगवेगळ्या क्षेत्रातल्या व्यक्ती, संस्थांनीही विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. प्रा. विलास बेत, सर फाऊंडेशन, जिल्हा परिषदेच्या शाळा, ग्रीनसोल, सरल डिझाईन्स, व्हॉईस ऑफ व्हॉईसलेस अभियान, ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान अशा कितीतरी जणांची नावे येथे सांगता येतील. सामाजिक कार्यासंबंधीच्या उपक्रमांमध्ये प्रिसिजनप्रमाणेच या संस्था आणि व्यक्तींनीही मनापासून सहभाग घेतला. सोलापूरातील प्रसारमाध्यमे, शासकीय/प्रशासकीय यंत्रणा यांनीही मोलाचे सहकार्य केले. या सर्वांचा परिणाम म्हणून प्रिसिजन फाऊंडेशन आता अनेकांना आधार वाटू लागली आहे.

शिक्षण, आरोग्य, सामाजिक प्रश्न, शाश्वत विकास आणि कला व संस्कृती या पाच क्षेत्रांमध्ये आम्ही यापुढे कायमच कार्यरत राहणार आहोत. वरवरची दुरूस्ती न करता एखाद्या प्रश्नावर कायमचा इलाज शोधण्याचाच आमचा प्रयत्न असेल. त्याला सर्वांनी साथ द्यावी हीच विनंती !



**डॉ. सुहासिनी शहा**

अध्यक्षा,

प्रिसिजन फाऊंडेशन, सोलापूर

**सामाजिक उत्तरदायित्व निधीचा वापर किती योग्य पध्दतीने करता येऊ शकतो, शेवटच्या घटकापर्यंत त्याचा लाभ कसा नेता येऊ शकतो याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे हा 'प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्प' आहे. शिक्षण व्यवस्थेत हा प्रकल्प क्रांती घडवेल याचा आम्हाला विश्वास वाटतो.**

# सामाजिक उत्तरदायित्व निधीचा योग्य वापर

**प्रा**थमिक शिक्षण हा एकूण शिक्षणाचा आणि व्यक्तिविकासाचा पाया आहे. मुलांच्या विकासाची मुहूर्तमेढ तिथेच रोवली जाते. मध्यंतरी आम्ही 'ग्राममंगल'च्या माध्यमातून चालणाऱ्या वाई, जि. सातारा येथिल एका शाळेत गेलो होतो. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. रमेश पानसे सरांच्या मार्गदर्शनाखाली ती शाळा चालते. अप्रतिम शाळा होती ती. त्यातून प्रेरणा घेऊन 'मूल शिकतं कसं?' याच विषयावर शिक्षक आणि पालकांची एक कार्यशाळाही 'प्रिसिजन'च्या माध्यमातून आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या माध्यमातून 'ज्ञानरचनावाद' खऱ्या अर्थाने समजून घेता आला. आपल्याकडची शिक्षण पध्दती ही बरीचशी परीक्षाकेंद्रीत आहे. मुलांना स्वतः करून पाहात, अनुभवातून शिकत 'शहाणं' होण्याची संधी आपल्या साचेबध्द शिक्षणपध्दतीत फारशी मिळत नाही. याउलट पाश्चात्य देशात कृतीयुक्त शिक्षणावर जास्त भर दिला जातो. त्यातून मुलांच्या बुध्दीमत्तेला चालना मिळते. प्रयोगशीलता, कृतीशीलता वाढते. निरिक्षणशक्ती वाढते. स्वतःची विचारक्षमता वाढते.

'ई लर्निंग' ही एक मोघम संकल्पना आपल्याकडे शिक्षण व्यवस्थेत रूढ होऊ पाहते आहे. एखादा संगणक असला, प्रोजेक्टर असला किंवा टी व्ही असला तरी त्याला 'ई लर्निंग' म्हटले जाते. प्रोजेक्टरच्या पडद्यावर एखाद्या विषयाशी संबंधित फिल्म दाखवायची. मुलांनी ती पाहायची आणि त्यातून शिकायचं. पारंपारिक पध्दतीने शिकवण्यापेक्षा या दृक्श्राव्य माध्यमाचा निश्चितच उपयोग होतो. पण यामध्ये शिक्षक 'पॅसिव्ह' होऊन जातो. त्यापेक्षा हा पडदाच 'इंटरॲक्टिव्ह' झाला तर शिक्षकांबरोबरच विद्यार्थ्यांचा कृतीशील सहभाग वाढू शकतो. विद्यार्थ्यांना हसतखेळत या नव्या माध्यमातून शिकता येऊ शकते. म्हणून आम्ही 'इंटरॲक्टीव्ह डिजिटल स्कूल'चा आग्रह धरला. ही 'इंटरॲक्टिव्ह'ची संकल्पना आम्हाला कळाली ती श्री. संदीप गुंड या उपक्रमशील शिक्षकाच्या माध्यमातून. गेल्या दोन वर्षात 'प्रिसिजन'च्या सामाजिक उत्तरदायित्व निधीमधून आपल्या सोलापूर जिल्ह्यातल्या शंभर शाळांना अशा पध्दतीने 'इंटरॲक्टीव्ह' डिजिटल स्कूल' बनवताना आम्हाला खूप आनंद वाटतोय. ही छोटीशी पुस्तिका म्हणजे त्या 'आनंदाचं' डॉक्यूमेंटेशन आहे, असं म्हटल्यास वावगं ठरू नये.

आमच्यासाठी हा एक अतिशय वेगळा अनुभव होता. आम्ही उद्योगातली माणसं असल्याने शिक्षण व्यवस्थेशी फारसा संपर्क आला नाही. 'ई लर्निंग'चा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शाळांची निवड, शाळांशी संपर्क, शिक्षकांशी संपर्क, प्रशासनाचे सहाय्य या सगळ्या गोष्टी सुकर झाल्या त्या 'सर फाऊंडेशन' या उपक्रमशील संस्थेमुळे! सर फाऊंडेशनच्या सहाय्याशिवाय हा प्रकल्प इतका चांगल्या पध्दतीने पूर्णत्वास नेणे शक्यच नव्हते. त्यामुळे सर फाऊंडेशनचे संस्थापक श्री. सिध्दाराम माशाळे आणि श्री. बाळासाहेब वाघ यांचे मनापासून आभार!

पहिल्या टप्प्यातील ५२ शाळांसाठी रजत कॉम्प्युटर्सचे श्री. राजेश चासकर यांचे तर दुसऱ्या टप्प्यातील ४८ शाळांसाठी 'फोर्टेक सोल्युशन्स'चे श्री. विश्वास येळणूरकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रत्येक शाळेतील ई लर्निंग सुविधा विनाव्यत्यय चालावी म्हणून आम्ही सोलार पॅनलची उपलब्धता करून दिली. जोगेश्वरी सर्व्हिसेसचे श्री. ओंकार मोडक यांनी अतिशय तन्मयतेने हे काम पूर्ण केले. या सर्वांचेच आभार.

या ई लर्निंग प्रकल्पाचा तटस्थपणे अभ्यास करावा, प्रकल्पातील शाळांना वेळोवेळी मार्गदर्शन करावे, शिक्षकांशी सातत्याने संवाद साधावा या उद्देशाने आम्ही सोलापुरातील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. विलास बेत यांना विनंती केली. गेली दोन वर्षे ते या प्रकल्पासाठी मेंटॉर म्हणून काम पाहतायत. त्यांच्या प्रयत्नामुळे ई लर्निंग प्रकल्पाला एक तर्कशुध्द अधिष्ठान प्राप्त झाले आहे. त्यांचेही मनःपूर्वक आभार!

सामाजिक उत्तरदायित्व निधीचा वापर किती योग्य पध्दतीने करता येऊ शकतो, शेवटच्या घटकापर्यंत त्याचा लाभ कसा नेता येऊ शकतो याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे हा 'प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्प' आहे. या प्रकल्पाचा प्रवास यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा स्वीकार करावा ही विनंती.



**प्रा. विलास बेत**
मेंटॉर,
प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्प

**प्रिसिजनच्या ई लर्निंग प्रयोगाचे वेगळेपण खरोखरीच लक्षणीय आहे. हा प्रकल्प शिक्षण क्षेत्रात रोल मॉडेल व्हावा. शासन पातळीवर ह्या प्रकल्पाचे सादरीकरण करून त्याची सार्वत्रिकता सिद्ध करण्याचे प्रिसिजनचे प्रयत्न फलद्रूप होतील, यात शंका नाही.**

# रोल मॉडेल होण्यासारखा शैक्षणिक प्रयोग

प्रिसिजनची औद्योगिक वाटचाल जिथून सुरु झाली त्या अक्कलकोट रोड परिसरातील श्रमजीवी नगरमधील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा. जिथे बहुसंख्य गरीब श्रमिकांचीच मुलं शिकतात. परंतु शाळेची अक्षम्य दुरवस्था. पावसाळ्यात अक्षरशः मुलं मातीत चिखलात बसतात. एकही वर्ग सुरक्षित आणि नीट बांधलेला नाही. पत्र्याचे गळके छप्पर कधी कोसळेल याचा नेम नाही.

वर्गात बसण्यायोग्य बांधकाम आणि फरशीकरण करण्यासाठी आर्थिक मदत द्यावी या मागणीसाठी शाळेतील शिक्षक प्रिसिजनकडे आले होते. मदत देण्याआधी ती सत्पात्री ठरेल की नाही हे पाहण्यासाठी आम्ही प्रत्यक्ष जाऊन ती शाळा पाहिली. तेंव्हा शाळेची गरज तीव्रतेने लक्षात आली. मदत द्यायचाही विचार पक्का केला. शिक्षकांचा दृष्टीकोन तपासण्यासाठी आम्ही त्यांना विचारले की, प्रिसिजन जरूर मदत करेल परंतु ती एकतर्फी नसेल. शाळेसाठी तुम्ही काय करणार हे सांगा. तेंव्हा शिक्षकांनी सक्रीय पुढाकार घेतला. पालक आणि मुलंही शाळेसाठी शिक्षकांबरोबरच धडपडली. शिक्षकांनी जमेल तेवढी रक्कम दिली. शिवाय दातृत्व असणाऱ्यांशी संपर्क साधूनही निधी जमविला.

अल्पावधीतच शाळेसाठी दीड लाख रुपये गोळा केले. हे त्यांचे सकारात्मक प्रयत्न लक्षात घेऊन प्रिसिजनने शाळेसाठी वर्गखोल्या बांधून दिल्या. २००९ मध्ये घडलेल्या ह्या छोट्या मदतकार्याने आम्ही शैक्षणिक कार्याचा श्रीगणेशा केला.

कामगार कल्याण योजनेअंतर्गत प्रिसिजनमधील कामगार व कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शैक्षणिक फी, पुस्तके, गणवेष तसेच होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विशेष सहकार्य अशी भरीव मदत चालूच होती. चांगले गुण मिळविणाऱ्या कामगारांच्या पाल्यांना प्रोत्साहनपर बक्षीसेही दिली जातात. प्रिसिजनमधील कर्मचाऱ्यांपुरते मर्यादित असे काम करताना या गरीब कामगारांच्या होतकरू मुलामुलींची क्षमता आणि गरज लक्षात आली. त्यांना मदतीचा हात देण्याची आवश्यकता देखील समजली. त्यातूनच अशा होतकरू मुलामुलींच्या शैक्षणिक विकासासाठी नियोजनबद्ध काही करावं हा विचार पुढे आला. तशी शहा परिवाराची शैक्षणिक संस्थांना मदत करण्याची जुनी परंपरा आहे. त्यामुळे श्रमजीवी नगरमधील मुलांच्या शाळेसारख्या इतर शाळांचा शोध सुरु झाला. प्रिसिजनच्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेमुळे शिक्षण क्षेत्रातील अनेक लोक छोट्यामोठ्या मदतीसाठी देत असत.

त्याचदरम्यान सेटलमेंट म्हणजे ब्रिटीश राजवटीत गुन्हेगार लोकांच्या पुनर्वसनासाठी स्थापित लोकवस्ती, जी स्वातंत्र्यानंतरही कायम राहिली अशा लोकांच्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी अनेक वर्षे कार्यरत सोनामाता विद्यालयाशी आमचा संपर्क आला. शिक्षणाबरोबरच संस्कारही देणारी ही संस्था योग्य पाठबळाअभावी खूपच दुर्दैवी स्थितीत होती. प्रिसिजनसारख्या संस्थेच्या नेतृत्वाखाली काम केले तर शैक्षणिक क्षेत्रात आदर्श निर्माण करता येईल ह्या विचाराने त्यांनी आमच्याकडे प्रस्ताव दिला. प्रिसिजनने औद्योगिक क्षेत्रातील यशासोबतच शाळा आणि मुलं घडवून शिक्षण क्षेत्रातही एक रोल मॉडेल निर्माण करण्याचा निश्चय केला. संस्थाचालकांशी बोललो. रीतसर ती शाळा दत्तक घेतली. खरेतर प्रिसिजन आणि सोनामाता विद्यालय दोन्हीही संस्थांसाठी हे एक मोठे आव्हान होते.

ज्ञानरचनावादी शिक्षणाची संकल्पना आणि त्याची कार्यपद्धती ह्याविषयी ऐकले होते. त्यावर काही लोकांशी चर्चाही केली. ते नीट समजून घेण्यासाठी आम्ही निवडक शिक्षकांसह मिळून सातारामधील वाई येथील ग्राममंगल संस्थेला प्रत्यक्ष भेट दिली. तिथला यशस्वी प्रयोग पाहिला. अध्ययन अध्यापनाची कार्यपद्धती समजून घेतली. ती इथल्या शिक्षकांना आणि पालकांना विश्वासात घेऊन समजावली. विद्यार्थ्यांमध्ये आनंददायी शिक्षणपध्दतीची आवड निर्माण करण्यासाठी भौतिक सुविधा देण्याची गरज होती. परिसरातील लोकांचा उपद्रव कमी करण्यासाठी संरक्षक भिंत, सुरक्षित मैदान, अद्ययावत क्रीडांगण, खेळाचे समान, प्रयोगशाळा, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय, वाचनालय यासारख्या गोष्टींची अग्रक्रमाने पूर्तता केली. संस्थेच्या कामकाजामध्ये सकारात्मक बदल करण्यासाठी प्रिसिजनच्या आर्थिक

मदतीबरोबर प्रत्यक्ष शाळेतील कार्यपद्धतीत हस्तक्षेप करणाऱ्याची गरज वाटली. त्यासाठी तीन सक्षम मंडळींची विश्वस्त म्हणून नेमणूक केली. ई-लर्निंग संकल्पनेतील सुसज्ज चाईल्ड थिएटर निर्माण केले. शाळेची सुंदर रंगरंगोटी केली. बघता बघता शाळेचा कायापालट झाला. ह्या सर्वांगीण शैक्षणिक प्रयोगामुळे चोऱ्या करणाऱ्या मुलांमध्ये अल्पावधीतच खूप सकारात्मक बदल झाले. त्यामुळे आमचाही उत्साह वाढला. त्यातून जणू माणसं घडविण्याचा छंद लागला. वेगळी दृष्टी मिळाली. ह्याच भूमिकेतून प्रिसिजनमधील कामगारांची मुलं घडविली तर... अशी कल्पना डोक्यात आली आणि पुढच्या प्रवासाची दिशा हळूहळू आकाराला आली. समाजाचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर केवळ सांस्कृतिक कार्यक्रम करून चालणार नाही तर समाज परिवर्तन घडविणारे शैक्षणिक प्रयोग करण्याची गरज लक्षात आली. ह्याच भूमिकेतून प्रिसिजन गप्पाअंतर्गत ग्राममंगल संस्थेचे अग्रणी रमेश पानसे सरांची विस्तृत मुलाखत घेतली. अध्ययन व अध्यापनामध्ये विद्यार्थी घडविण्यासाठी नेमके काय करता येईल ह्याविषयी सोलापूरातील विविध शाळांतील शिक्षक आणि पालकांसाठी पानसे सरांचे मार्गदर्शन झाले. एका अर्थाने प्रिसिजनची शिक्षणविषयक भूमिकाच लोकांपर्यंत पोचली.

एकीकडे शैक्षणिक मार्गदर्शन आणि त्यासोबत गरजू शाळांना सर्वतोपरी मदत करणारी संस्था म्हणून अल्पावधीतच प्रिसिजनची प्रतिमा बनली. ह्या पार्श्वभूमीवर प्रिसिजनच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी म्हणजेच सामाजिक उत्तरदायित्वाच्या योजनेअंतर्गत अशा गरजू शाळांना विकासाची संधी देण्याचा विचार पुढे आला. त्यासाठी सुरुवातीला प्रिसिजनमधील कामगार ज्या भागातून येतात त्या शाळा निवडल्या तर दुहेरी फायदा होईल म्हणून अशा शाळांना भेटी दिल्या. त्यांच्या गरजा लक्षात घेतल्या. विशेषतः जिल्हा परिषद, महानगरपालिकेच्या तसेच झोपडपट्ट्यांमधील शाळांची जाणीवपूर्वक पाहणी केली. १४ शाळांना गरजेनुसार सुविधा म्हणजे पिण्याच्या पाण्याची टाकी, स्वच्छता गृह, पटांगण, वर्गखोल्या, कॉम्प्युटर, प्रोजेक्टर, साउंड बॉक्स, पुस्तक अशा गोष्टी दिल्या. ह्या निमित्ताने प्रत्यक्ष शाळांशी जोडले गेल्यामुळे शिक्षण कसे दिले घेतले जाते हे कळले. अनेक भ्रम नाहीसे झाले. कारण वस्तूस्थिती खूपच वेगळी होती. हे सारे पाहिल्यानंतर प्रिसिजनला शैक्षणिक कार्य करण्यासाठी भरपूर वाव आहे हे लक्षात आले. पण घाई न करता आपल्या हस्तक्षेपाच्या मर्यादा समजून घेत थोडेच पण परिणामकारक काम करण्याची भूमिका घेतली. ह्या मदत केलेल्या १४ शाळांशी सतत संपर्कात राहून तिथेच भरीव काही करावं असा निर्णय करून काम सुरु केले.

दरम्यान सोलापूर सकाळमध्ये प्रयोगशील शाळांवरील लेख वाचनात आला. त्यातून प्रयोगशील शिक्षकांच्या सर फाऊन्डेशनविषयी वाचले. खूपच वेगळे वाटले. कुठलेही अनुदान न घेता आणि अपेक्षा न ठेवता जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेच्या म्हणजेच नाकारलेल्या शाळांमधील सृजनशील शिक्षकांचा मागोवा घेत त्यांना बळ देण्याचे काम मनापासून भावले. प्रिसिजनच्या भूमिकेच्या जवळ जाणारी सर फाऊन्डेशन नेमकी काय आहे हे समजावून घेतल्यानंतर आम्ही अधिकच प्रभावित झालो. त्यांच्याशी जोडून घेतले तर प्रिसिजनचे शैक्षणिक कार्य अधिक जोमाने आणि योग्य दिशेने पुढे जाईल असे वाटले. त्यांची भेट घेतली. चर्चा केली. त्यांचे आजपर्यंत केलेले काम तपासले. २०१६ मध्ये प्रिसिजन गप्पाअंतर्गत देण्यात येणारा उत्कृष्ट सामाजिक सेवेचा पुरस्कार सर फाऊंडेशन ह्या स्वयंसेवी संस्थेलाच दिला.

त्यामुळे सर फाऊंडेशनमधील अत्यंत विपरीत परिस्थितीत विद्यार्थी घडविणाऱ्या कल्पक तसेच उत्कृष्ट शिक्षकांची ओळख झाली. त्यांची धडपड कळली. अशा शिक्षकांच्या गरजा, अपेक्षा समजल्या. सर फाऊंडेशनचे प्रमुख कार्यकर्ते सिद्धाराम माशाळे आणि बाळासाहेब वाघ ह्यांच्याशी वारंवार झालेल्या चर्चांमधून गरीब होतकरू मुलांच्या आणि त्यांच्यासाठी धडपडणाऱ्या शिक्षकांच्या अडचणी कळल्या. त्यांना लागणाऱ्या भौतिक सुविधांची गरज लक्षात आली. एका अर्थाने आमचेही शिक्षण झाले. सीएसआरच्या माध्यमातून उपलब्ध निधीचा उपयोग योग्य पद्धतीने करण्याच्या प्रिसिजनच्या भूमिकेला आवश्यक सामाजिक बळ मिळाले. पुढील कामाला दिशा मिळाली.

प्रचलित शिक्षण पद्धतीतील अडचणी समजल्यामुळे शिक्षणाचा नव्याने विचार करण्याची गरज लक्षात आली. शिक्षककेन्द्री शिक्षणाऐवजी विद्यार्थीकेंद्री शिक्षण असावे. मुलांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळावी. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळा, शहरातील महानगरपालिका शाळांमधून प्राथमिक स्तरावर परिपूर्ण शिक्षणाची व्यवस्था करावी असा विचार पुढे आला. त्यासाठी ग्राममंगलचा ज्ञानरचनावाद आम्हाला जवळचा वाटला. कारण आपण जेंव्हा मुलांना एखादी गोष्ट शिकवायला जातो, तेंव्हा त्याला काहीही माहीत नसते. त्यामुळे मूल त्यासंदर्भातील काही स्वतःची निरीक्षणे, स्वानुभव, असणाऱ्या शक्यता त्याला आठवतात. तो जे ऐकतो आणि त्याला पूर्वीपासून जे माहित असते, त्यांची तो सांगड घालतो, अशा त्याच्या अनुभवातून जी अभिव्यक्ती होते त्यातून मूल आपल्या ज्ञानाला आकार देत असते म्हणजेच त्या पद्धतीने मिळालेल्या ज्ञानाची रचना करते. त्यालाच ज्ञानरचनावादी शिक्षण पद्धती म्हणतात.

त्या प्रणालीचा वापर करून ई-लर्निंगसारख्या अद्ययावत माध्यमातून मनोरंजक आणि आनंददायी शिकणं शिकविणं शक्य होईल असा विश्वास वाटला. डिजिटल इंडियाचे वारे देशभर जोमाने वाहत आहेत. त्याच्या प्रसारासाठी जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांच्या माध्यमातून शिक्षक, स्वयंसेवी संस्था आणि लोकसहभागातून अनेक योजना राबविण्यात येत आहेत. शिक्षकांना टेक्नोसॅव्ही म्हणजे तंत्रस्नेही बनविण्यासाठी प्रशिक्षण दिले जात आहे. डिजिटल शाळा प्रकल्पामुळे शैक्षणिक गुणवत्तादेखील वाढली आहे. हे सगळे घडत असताना शासनाबरोबरच कॉर्पोरेट उद्योग देखील सीएसआर म्हणजेच कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीसारख्या उपक्रमाअंतर्गत स्वयंसेवी संस्थांशी सामंजस्याचे करार करून शैक्षणिक प्रकल्प राबविण्यात पुढाकार घ्यावा अशी शासन आणि समाजाची अपेक्षा आहे. अशा वेळी प्रिसिजन मागे राहणे शक्यच नाही. २००९ पासून चालू असलेले प्रयत्न आता शिस्तबद्ध प्रकल्पांतर्गत पुढे न्यावेत ह्यासाठी योजना बनविली.

सुरुवातीच्या १६ शाळांनंतर शहर आणि जवळपासच्या परिसरातील अशा गरजू शाळांचा शोध सर फाऊंडेशनच्या मदतीने घेतला. शाळांची निवड करताना त्यांचा काही वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव, शिक्षक आणि शाळांची क्षमता, त्यांचे प्रयत्न आणि ई लर्निंगची शक्यता तपासून शाळांची निवड केली. २०१६ पर्यंत नव्या आणि जुन्या मिळून अशा एकूण ४८ शाळांमधू प्रिसिजनने ई लर्निंग किट दिले. त्यासाठी ठाणे जिल्ह्यातील पष्टेपाडासारख्या आदिवासी भागात डिजिटल स्कूलची संकल्पना ई

लर्निंग पद्धतीने राबविणारे संदीप गुंड ह्यांची मदत झाली. त्यांची झी टीव्हीवरील मुलाखत पाहिली, शिवाय सर फाऊंडेशनमधून तेही सक्रीय असल्यामुळे आम्ही त्यांच्या कर्मभूमीत म्हणजे पष्टेपाड्याला जाऊन आदिवासी मुलांची ई लर्निंग अध्ययन-अध्यापन पद्धती पाहिली.

त्यांच्या तुलनेने इथली मुलं निश्चितच पुढारलेली म्हणून ई लर्निंग किट शाळांना देण्याचा विचार पक्का केला. अवघ्या महिन्याभरात प्रत्येकी १,४०,००० रक्कमेची ४० शाळांमधून जोडणी केली. त्यासाठी देखील प्रिसिजनच्या शिरस्त्याप्रमाणे प्रत्येक शाळेने स्वखर्चाने तसेच लोकवर्गणीतून किमान बोर्ड, वर्ग तयारी, इलेक्ट्रिक वायरिंग अशा गोष्टी कराव्यात असा आग्रह धरला. त्यासाठी शिक्षक, विद्यार्थी, गावकऱ्यांनी केलेली धडपड खूपच उत्साहवर्धक होती. त्यानंतर शाळांशी रीतसर लेखी करार करून एलसीडी प्रोजेक्टर, लॅपटॉप, आय.आर. कॅमेरा, स्पीकर, इंटरॅक्टीव्ह डिव्हाईस, पहिली ते सातवीमधील विद्यार्थ्यांसाठी करिक्युलम सॉफ्टवेअर, प्रिंटर ह्या गोष्टी दिल्या. व्हीजीए एचडीएमव्ही केबल, पॉवर केबल, मास्टर टॅब्लेट, डोंगल अशी संपूर्ण परिपूर्ण तांत्रिक जोडणी ई शिक्षा सोल्यूशनसह ४० शाळांमधून केली.

आता शिक्षकांचे प्रशिक्षण हवे होते. त्यासाठी संदीप गुंड सोलापुरात आले. २६ नोव्हेंबर २०१६ रोजी एक दिवसाची कार्यशाळा शिक्षकांसाठी घेतली. ते हाताळण्याचे ज्ञान दिले. अशा रितीने शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक माध्यमाच्या वापरातून आंतरक्रिया (इंटरॲक्शन) सुरु झाले. पारंपारिक शिक्षणपद्धतीमधील शिक्षकांनी शिकविणे आणि विद्यार्थ्यांनी शिकणे अशा अध्ययन-अध्यापन प्रकाराऐवजी शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये संवादपूर्ण आंतरक्रिया सुरु झाली. विद्यार्थी स्वतः वेगवेगळी माध्यमे, इंटरनेट, व्हिडिओ वापरून स्व-अध्ययनाकडे वळले. हे यश लक्षात घेऊन आणखी १२ शाळांना ई लर्निंग किट दिले. आता प्रिसिजन ई लर्निंग ताफ्यात एकूण ५२ शाळा सामील झाल्या. वर्षभर नियमितपणे ह्या शाळांमधील अपेक्षित बदल तज्ज्ञ कर्मचाऱ्यांच्या शिस्तबद्ध हस्तक्षेपातून तपासले जातात.

ह्या सर्व शाळांमधील शिक्षकांनी व्हॉटस्ॲपवर ग्रुप तयार केला. त्यातून प्रत्येकाने केलेले प्रयोग, उपलब्धी, विशेष गोष्टी, त्याचे व्हिडीओ, ऑडिओ, क्लिप्स, प्रत्यक्ष विद्यार्थ्यांनी बनविलेल्या सर्व गोष्टींचे आदान-प्रदान व्हायला लागले. एकूणच ह्या सर्व शाळांमधून चैतन्याचे वातावरण सुरु झाले. शिक्षक तंत्रस्नेही बनले. विद्यार्थी सुट्टीच्या दिवशीही शाळेत यायला लागले. उपस्थिती आणि पटसंख्या वाढली. दप्तराचे ओझे कमी झाले. विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांना वाव मिळायला लागला. मनोरंजन आणि शिक्षणाचा समन्वय साधण्यासाठी रेकॉर्डिंग, स्कॅनर, लायब्ररी टूल, गुगल, यू-ट्यूब, ऑडिओ, व्हिडिओ, डिजिटल स्लेट वापरून टेक्स्टबुक डाऊनलोड, कार्टूनचा वापर करून शिक्षण आनंददायी करण्यात यशस्वी झाले. शाळेतल्या स्नेहसंमेलनासाठी एरवी प्रशिक्षक नेमून हजारो रुपये खर्च करून नृत्य आणि गाणी बसविली जायची. त्याऐवजी इंटरनेट वापरून कोरिओग्राफिक क्लिप्स वापरून बिनखर्चाचे उत्तमोत्तम कार्यक्रम सादर करण्यात येऊ लागले. ते पाहण्यासाठी पालक पहिल्यांदा शाळेत आले.

सहलीविषयी देखील प्रत्यक्ष ज्या ठिकाणांना भेटी द्यावयाच्या, त्यांची चित्रमय माहिती पालकांना दाखविल्यामुळे त्यांना सहलीचे महत्व कळले. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये नवा संवाद घडू लागला. मुलांची वाचनक्षमता वाढली. आता शिक्षक आणि विद्यार्थी इंग्रजी भाषेतून संवाद साधण्याचा प्रयत्न करताना पाहिल्यानंतर पालक खुश आहेत. पालकांमध्ये देखील शाळेत काय चालते ह्याविषयी उत्सुकता निर्माण झाली. जगभरातल्या सर्व गोष्टी शिकण्याची संधी मिळाल्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांचा आत्मविश्वास वाढला. तंत्रज्ञानाविषयीची भीती नष्ट झाली. कृतीयुक्त डिजिटल अध्ययन-अध्यापन सुरु झाले. माऊस आणि पेन वापरून बोर्डावर आणि स्क्रीनवर अगदी सहजपणे विद्यार्थी व्यक्त व्हायला लागले. स्वतःची फाईल तयार करून ती सेव्ह करणे, पीपीटी बनविणे, स्लाईड्स तयार करणे, ती शेअर करणे यामुळे मुले स्वतःहून विषयज्ञान वाढविण्यासाठी प्रयत्न करायला लागले. इथून खरे ज्ञानग्रहण सुरु झाले. शिक्षकांना शिकविणे आणि विद्यार्थ्यांना शिकणे आनंददायी वाटायला लागले. ज्ञानरचना प्रत्यक्षात अनुभवायला मिळाली.

ह्या ई लर्निंग प्रयोगामुळे सर्वांनाच शाळा आपली वाटायला लागली. शाळांमध्ये सकारात्मक चढाओढ सुरु झाली. एकंदरीत शाळांमधील स्थितीवादी वातावरण बदलून चैतन्यदायी बनले. ह्या शाळांची निवड करताना जाणीवपूर्वकपणे उर्दू, मराठी, कन्नड, तेलुगु, अशा विविध भाषांमधून शिक्षण देणाऱ्या तसेच जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि झोपडपट्ट्यांमध्ये उपेक्षित मुलामुलींच्या तसेच तांड्यावरच्या, एकशिक्षकी शाळा निवडल्या. ह्या शाळांमधील मुलांकडे आणि शिक्षकांकडे बघण्याचा सामाजिक दृष्टीकोन चांगला नसतो. त्यामुळे शाळांमध्ये मुलेही पाठविली जात नाहीत. शासनदेखील केवळ जबाबदारी म्हणूनच ह्या शाळांकडे पाहते. त्यांना विकासाची संधी देण्याची गरज असल्यानेच त्यांची विशेषत्वाने निवड केली. इतक्या भिन्नतेच्या शाळांना ज्ञानरचनावादी शिक्षणाच्या संकल्पनेतून एका सूत्रात शिस्तबद्ध पद्धतीने आणणे, हेच एक मोठे आव्हान होते.

तुलनेने सुखवस्तू अशा इतर शाळांमधील विशेषतः इंग्रजी माध्यमातील शेजारच्या शाळांमधील मुले ह्या उपेक्षित शाळांमधील ई लर्निंग अंतर्गत चिल्ड्रन्स थिएटर, त्यातील इंटरॅक्टीव्ह स्मार्ट बोर्ड क्लासरूम पाहून ह्या शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी पालकांच्या मागे तगादा लावत आहेत. शाळा व्यवस्थापन समित्या सक्रीय झाल्या. गावातले वातावरण बदलेले. काही गावं ह्यामुळे संगणक साक्षर होत आहेत. ह्या शाळातील शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी चक्क शाळा रंगविल्या. ह्या ई लर्निंग वर्गांच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेत आहेत. गावकरीदेखील शाळेकडे वेगळ्या भूमिकेतून पाहत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये झालेले वर्तनबदल खूपच उत्साहवर्धक आहेत. ह्या शाळा आता प्रयोगशील आणि उपक्रमशील शाळा बनत आहेत. शिक्षण खात्याचे अधिकारी देखील ह्या बदलांची सकारात्मक नोंद घेताना दिसतात.

ह्या सगळ्या सकारात्मक गोष्टी घडताना शिक्षकांच्या कालबद्ध बदल्या अपेक्षित असल्यामुळे त्यांची एकाग्रता भंग पावते. अस्थिरतेच्या मानसिकतेत असलेल्या शिक्षकांचे मनोबल वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. शेवटी जी आपल्या ताब्यात नाही अशी शासकीय व्यवस्था बदलता येत नाही हेच खरे. बदली झाली तरी जाईल तिथे आम्ही हा प्रकल्प सुरु करू आणि नेटाने काम करू, अशा शब्दात जेंव्हा शिक्षक बोलतात त्यातच या प्रकल्पाचे यश सामावले आहे. शिक्षकांना लोकसहभागातून ह्या गोष्टी करणे शक्य आहे हा आत्मविश्वास ह्या प्रयोगाने दिला. अनेक गावकऱ्यांनी, ग्रामपंचायतींनी आर्थिक मदत देऊन भरीव सहकार्य केले.

विद्यार्थ्यांची आणि पालकांची गरीबी देखील अडचणीची ठरली नाही. त्यांचा सकारात्मक दृष्टीकोन ह्या प्रकल्पाच्या माध्यमातून घडविण्यात यश मिळाले. ई लर्निंग न स्वीकारणारे देखील हळूहळू शिकण्यासाठी सहभाग वाढविताना दिसतात. विरोधकांची धार कमी झाली. शिक्षण खात्यातील अधिकारी शाळाभेटीनंतर समाधान व्यक्त करून सहकार्याचे आश्वासन देतात हीच शिक्षकांच्या प्रयत्नाची फलश्रुती म्हणता येईल. गेल्या दोन-तीन वर्षातला ४८ शाळांमधील प्रयत्नातून होत असलेले सकारात्मक बदल लक्षात घेता प्रिसिजन सीएसआरच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून आणखी ५२ शाळांना सहभागी करीत एकूण १०० शाळांचा ई लर्निंगचा शैक्षणिक प्रयोग रोल मॉडेल म्हणून समाजासमोर आणू इच्छिते. त्यासाठी शाळांची निवड देखील पूर्ण झाली.

येत्या तीन वर्षात ह्या १०० शाळांमध्ये नेमके कोणते बदल अपेक्षित आहेत, त्याचे निदर्शक (इंडिकेटर) देखील निश्चित करण्यात आले आहेत. उद्दिष्टे स्पष्ट आहेत. शाळांची विविधता अडचणीची ठरणार नाही तर त्याही परिस्थितीत एका समान सूत्राच्या माध्यमातून शाळांचे मूल्यमापन होईल. शिक्षकांचेही प्रशिक्षण होईल. विद्यार्थ्यांना आत्मविश्वास आणि शिक्षकांना कामाचे समाधान देणारी अध्ययन-अध्यापन पद्धती विकसित करता येईल ह्या दृष्टीकोनातून प्रयत्न चालू आहेत. पुढील तीन वर्षाच्या कालावधीत १०० शाळांचा ई लर्निंग प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यासाठी निरंतर मूल्यमापनाची पद्धत रूढ करण्याचा प्रयत्न होणार आहे. अर्थात हजाराहून अधिक शिक्षक, त्याहून अधिक विद्यार्थी आणि एकूण व्यवस्थेला बरोबर घेऊन केलेल्या कामाचे मूल्यमापन विविधांगी आणि अडथळ्यांची शर्यत असणार आहे ह्याची जाणीव ठेऊन शक्यतो बिनचूक मूल्यमापन करण्याचा प्रिसिजनचा प्रयत्न राहील.

प्रिसिजनच्या ह्या प्रयोगाचे वेगळेपण खरोखरीच लक्षणीय आहे. शाळांची निवड, त्यासाठी प्रत्यक्ष क्षेत्रात प्रयोगशील शिक्षकांचा सहभाग, हस्तक्षेपाचे शास्त्रशुद्ध नियोजन, त्याचे व्यवस्थापन, गुणवत्तावाढ प्रमाण मानून केलेले प्रयत्न, निश्चित उद्दिष्ट्ये, निरंतर मूल्यमापन, शिक्षकांचे प्रशिक्षण, दस्तावेजीकरण, केलेला खर्च सत्कारणी लागण्यासाठीचा दृष्टीकोन, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, कार्यशाळांचे नेटके आयोजन, शिक्षकांचा प्रतिसाद मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न, लाभार्थी निश्चित करण्याची पद्धती, कालबद्ध योजना, त्यानंतरची लोकार्पणाची स्पष्टता आणि अंतिमतः ह्याचे लोकचळवळीत रुपांतर करण्याची भूमिका यासारख्या गोष्टीतून वेगळेपण स्पष्ट होते. हे रोल मॉडेल व्हावे, त्याचे इतरांनीही अनुकरण करावे. शासन पातळीवर ह्या प्रकल्पाचे सादरीकरण करून त्याची सार्वत्रिकता सिद्ध करण्याची तयारी ह्यातून प्रिसिजनचे प्रयत्न फलद्रूप होतील यात शंका नाही.




# डब्ब्याची शाळा

श्रमजीवी नगर, निलम नगर, सुनिल नगर असा सगळा परिसर म्हणजे वस्त्रोद्योग आणि विडी उद्योगातील कामगारांचा परिसर. याच परिसरातील श्रमजिवी नगरात महादेव मंदिराच्या शेजारी एक 'डब्ब्याची शाळा'. पाचही बाजूंनी पत्रे. ते पक्केही नव्हते. डांबराच्या, रॉकेलच्या पिपाचा पत्रा सरळ करून लावलेले. म्हणूनच या शाळेचं नांव होतं, 'डब्ब्याची शाळा'.

जिल्हा परिषदेची ही शाळा. सोलापूर महानगरपालिकेची हद्दवाढ झाली आणि या आसपासच्या शाळा भौगोलिकदृष्ट्या महापालिका क्षेत्रात आल्या. महापालिका हद्दीत असल्याने जिल्हा परिषदेचे दुर्लक्ष आणि शाळा जिल्हा परिषदेच्या असल्याने महापालिकेने लक्ष घालण्याचा विषयच नाही. अशा अडचणीत सापडलेल्या जवळपास १३ शाळा आहेत. 'ना घर का ना घाट का' अशी या शाळांची अवस्था !

प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड ही आमची कंपनी ज्या अक्कलकोट रोडवरील एमआयडीसीत आहे, त्याच परिसरातील ही 'डब्ब्याची शाळा'! या शाळेतील काही शिक्षक एक दिवस कंपनीत आले. डॉ. सुहासिनी शहा यांना त्यांनी शाळेची सगळी अवस्था सांगितली. चोहोबाजूंनी पत्रे असल्याने उन्हाळ्यात उष्णता, पावसाळ्यात पाऊस, एरवी धूळ आणि माती अशा आव्हानांना तोंड देत कामगारांची चिमुकली मुलं आपल्या आयुष्याचे धडे गिरवीत होती. शिक्षकांनीच यावर मार्ग काढायचं ठरवलं. प्रत्येक शिक्षकानं आर्थिक योगदान द्यायचं ठरवलं आणि लोकवर्गणी करून चार भिंती उभ्या करण्याचा निर्णय घेतला. याच उद्देशाने ही शिक्षकमंडळी प्रिसिजनकडे आली.

एकूण खर्च साधारणतः अडीच ते तीन लाखांपर्यंतचा होता. शिक्षकांनी एक लाख जमवले होते. उर्वरित खर्च प्रिसिजनने करावा अशी त्यांची अपेक्षा होती. डॉ. सुहासिनी शहा यांनी शिक्षकांची धडपड जाणली. मुळात स्वतः काही रक्कम उभी करून ते मदत मागायला आले होते, ही सगळ्यात भावणारी गोष्ट होती. नंतरच्या दोन दिवसांत त्या शाळेला समक्ष भेट देऊन सर्वेक्षण केले. करावयाच्या कामाचा आढावा घेतला. अंदाजित खर्च काढून प्रत्यक्ष कामाला सुरूवात केली.

भिंतीची उंची वाढवली. छताचे पत्र बदलून घेतले. गिलावा झाला. वर्गखोल्यांच्या समोरचा व्हरांडाही आच्छादित झाला. ध्वजस्तंभाचा कठडा दिमाखात उभारला. शाळेला आकार आला. एवढं झाल्यानंतर शाळेला रंग देणं भागच होतं. तोही देऊन झाला. मग शिक्षकांनी पुढाकार घेऊन त्या भिंतींवर भारताचा-महाराष्ट्राचा नकाशा, राष्ट्रगीत अशा गोष्टी चितारून भिंती अधिक बोलक्या केल्या. जूनमध्ये शाळेचा पहिला दिवस उजाडला आणि बच्चे कंपनीनं शाळेचा परिसर फुलून गेला. शाळेचं बदललेलं रूप पाहून मुलांचा आनंद चेहऱ्यावर ओसंडून वाहात होता! मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद हाच खरा प्रगतीचा 'इंडेक्स' असल्याचं जाणवलं.




# सोनामाता : एका जिद्दीची कहाणी

एक दिवस प्रिसिजनच्या चिंचोळी एमआयडीसीतील प्लान्टमध्ये गेटवरून फोन आला. 'अत्रे नावाच्या मॅडम तुम्हाला भेटायला आल्या आहेत. पाठवू का?' मी म्हटलं पाठवा. 'कोण असतील या...काय काम काढलं असेल...' असा विचार चालू असतानाच कुणीतरी त्यांना हाताला धरून सावकाश ऑफिसमध्ये आणलं.

त्यांच्या डोळ्याला दिसत नाही. वयाने पासष्ठी गाठलेली. सोलापुरातल्या लिमयेवाडी, सलगर वस्तीसारख्या तथाकथित गुन्हेगारीचा शिक्का असलेल्या वसाहतीत 'सोनामाता शिक्षण संस्थे'च्या माध्यमातून त्या ज्ञानदानाचं काम करतात. त्यांच्या वडिलांची आणि गुरूंची प्रेरणा घेऊन त्यांनी पंधरा-वीस वर्षांपूर्वी ती शाळा चालू केली. अनंत संकटांना झेलत, अडथळ्यांना पार करत शाळा सुरू केली. वाढवली आणि रूजवली. जिथे सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातली महिला पाय टाकणंही शक्य नाही अशा वस्तीत त्या एकट्याच्या हिंमतीवर पाय रोवून उभ्या होत्या! अचंबित करणारा हा प्रवास होता सगळा.

बालवाडी ते दहावीपर्यंतची शाळा. संस्कृतसाठी स्वतंत्र वर्ग. दहावीचा सलग तीन-चार वर्षे १०० टक्के निकाल. अत्रेबाई म्हणाल्या, 'माझं आता वय झालंय. डोळ्याला दिसत नाही. कुणातरी चांगल्या लोकांच्या हाती ही संस्था द्यायची आहे. प्रिसिजनशिवाय विश्वासू संस्था आतातरी माझ्या डोळ्यासमोर नाही. डॉ. सुहासिनी शहांना हे सगळं मला सांगायचं आहे. त्यांच्या पदरात ही संस्था घतली की मगच मला हायसं वाटेल...'

यथावकाश आम्ही शाळेला भेट दिली. शाळेची स्वतःची इमारत आहे पण कंपाऊंड वॉल नाही. वर्गांना दारंखिडक्या नाहीत. वस्तीतल्या लोकांची दादागिरी सहन करावी लागायची. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या पालकांचाही त्रास. नववी-दहावीच्या मुलींना रस्त्यावरच्या टवाळांचा सामना करावा लागायचा. सुट्टीनंतर शाळा उघडली की, वर्गामध्ये, व्हरांड्यात घाण पसरलेली. बाटल्यांचा खच पडलेला असायचा. कधी कधी उन्हाळ्याच्या सुट्टीत शाळेतच लग्नंही लागलेली असायची. संस्थेची परवानगी घेणं, विचारणं असं काहीच नाही. इतकी दहशत परिसरातल्या लोकांची होती. असं असूनही पाचशे-साडेपाचशे मुलांच्या किलबिलाटानं शाळेचा परिसर दणाणून गेलेला होता. फाटके, मळके कपडे, अनवाणी पाय अशा अवस्थेतली मुलं. मात्र अथर्वशीर्ष, संस्कृत सुभाषितांचं पठण अस्खलितपणे चालू होतं. मुलांच्या डोळ्यात चमक होती. मनात शाळेबद्दल, शिक्षणाबद्दल ओढ होती. शिक्षकांच्या धडपडीचा अविष्कार जागोजागी दिसत होता. पण आजुबाजुला अनेक नवीन शाळा निघालेल्या. इंग्लिश मिडियम. तिथल्या मोफत गणवेश, शूज आणि स्कूलबस अशा आमिषांमुळे शाळेचा पट कमी होण्याची भिती होतीच. अशा परिस्थितीत प्रिसिजननं ही संस्था दत्तक घेण्याचा धाडसी निर्णय घेतला.



# चाईल्ड थिएटर

प्रिसिजननं जेंव्हा काही शाळा ई-लर्निंग सुविधांनी युक्त करण्याचा निर्णय घेतला (अर्थात त्यात 'सोनामाता'चाही समावेश होताच), तेंव्हा तिथल्या शिक्षकांचा उत्साह नुसता ओसंडून वाहात होता. या प्रकल्पात निवडल्या गेलेल्या सगळ्या शाळांचं स्वतःचंही काही योगदान असावं म्हणून त्यांना आम्ही सांगितलं होतं की, चार बाय सहा फुटाचा एक पांढरा बोर्ड तुम्ही वर्गात बसवून लाईट फिटींग करून घ्या आणि ई-लर्निंगसाठीच्या वर्गाला तुमच्या कल्पकतेनं सजवा. 'सोनामाता'च्या शिक्षकांनी जे केलं ते अफलातून होतं. माध्यमिक आणि प्राथमिकच्या सगळ्या शिक्षकांनी मिळून २.३१ लाख रूपये वर्गणी गोळा करून सुसज्ज असं 'चाईल्ड थिएटर' बनवलं. दारंखिडक्या, प्लास्टर ऑफ पॅरिसचं छत, सुंदर असं चित्रकाम, खाली मॅटिंग, पंखे आणि लाईट. सगळा माहोल एकदम आकर्षक बनवला. शिक्षकांच्या कल्पकतेला आणि आर्थिक योगदानाला मनापासून दाद दिलीच पाहिजे. आता आम्ही आदर्श चाईल्ड थिएटर कसं असावं ते 'सोनामाता'मध्ये जाऊन पाहा', असं सगळ्या जिल्ह्यातल्या शाळांना सांगतो आहोत. सोनामाता शाळा आता एक शैक्षणिक पर्यटन केंद्र झालंय!



# रचनावादी शिक्षणाची पाऊलवाट

'प्रिसिजन गप्पा' या सांस्कृतिक कार्यक्रमात एकदा डॉ. रमेश पानसे यांची मुलाखत प्रा. विलास बेत यांनी घेतली. त्यातून रचनावादी शिक्षण पध्दतीची आवश्यकता लक्षात आली.
कारण रचनावादी शिक्षणानं मुलांच्या अंगभूत कौशल्याला वाव मिळतोच शिवाय, शिकणं रंजक होऊन जातं. डॉ. पानसेंनी भारत विद्यालय, (शहाबाग, वाई जि. सातारा) ही शाळा पाहायला सांगितली. ही शाळा म्हणजे ग्राममंगलच्या रचनावादी शिक्षणाचा उत्तम नमुना. सर्वत्र अनवाणी फिरता येईल इतकी स्वच्छता. तिथे वर्ग नाहीत. त्याऐवजी प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र शास्त्रालय आहे. मुलांनी त्या वर्गात जाऊन तो तो विषय शिकायचा. बाकडे नाहीत. शिक्षकांनी मुलांसोबत खाली बसायचं. केवळ शिकण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करायचं. मुलांनी स्वतःच शिकायचं.
या शाळेच्या भेटीला सोनामाता प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुवर्णा अत्रे आणि माध्यमिकचे मुख्याध्यापक विनोद शिंदे सोबत होते. असाच प्रयोग सोनामाता शाळेत करू या, असा निर्णय झाला. त्यासाठी शिक्षकांची मानसिकता बनवणे आवश्यक होते. बैठकीत शिक्षकांनी उत्साह दाखवला. ग्राममंगलच्या माध्यमातून शिक्षकांना प्रशिक्षित करून बालवाडीपासून दरवर्षी एक एक वर्ग रचनावादी शिक्षणाकडे वळवायचा असा विचार होऊन कार्यवाही सुरू झाली. ग्राममंगलच्या माध्यमातून पुण्यामध्ये गणेश कला व क्रीडा केंद्रात रचनावादी शिक्षणावर एक भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्या प्रदर्शनाला सर्व शिक्षकांनी भेट दिली. हे प्रदर्शन रचनावादी शिक्षणाची परिपूर्ण कल्पना देणारे होते. त्यामुळे एक नवी प्रेरणा मिळाली.




# प्राथमिक शिक्षणावर भर

प्रिसिजन गप्पांमधील डॉ. रमेश पानसे यांची मुलाखत, ग्राममंगलचा संपर्क, वाईच्या भारत विद्यालयाची भेट या सगळ्या घटनांचा एक परिणाम म्हणून प्रिसिजनच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्वाचा निधी योग्य पध्दतीने खर्च करायचा असेल तर शिक्षण आणि त्यातही प्राथमिक शिक्षण हा आग्रहाचा विषय ठेवावा याकडे प्रिसिजनच्या व्यवस्थापनाचा कल वाढला.

ग्रामीण भागात गुणवत्ता असूनही केवळ पुरेशा शैक्षणिक सुविधा नसल्याने तिथली मुलं मागे पडतात, हे एक सर्वमान्य निरीक्षण यामागे होतेच. मग त्यातूनच प्राथमिक शिक्षण आणि ग्रामीण भागातील शाळांवर अधिक लक्ष केंद्रीत करता येईल असा निर्णय झाला. याची सुरूवात कुठून करायची असा प्रश्न होता. प्रिसिजनचे कर्मचारी ज्या गावातून येतात त्या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळा निवडल्या. गावांची तसंच शाळांची संख्या काढली. १५ ते १६ गावातील शाळांचे सर्वेक्षण झाले.




# हा तर उलटा अनुभव आहे साहेब !

दक्षिण तालुक्यातील संगदरीच्या जि. प. शाळेत पोचायला तसा उशिरच झाला. शाळेची वेळ संपत आली होती. शिक्षक आणि मुख्याध्यापिका घरी निघण्याच्या तयारीतच होते. मैदानावर मुलं खेळत होती. मुख्याध्यापिकांची भेट घेतली. प्रिसिजन कंपनीची माहिती दिली आणि येण्याचं कारणही सांगितलं.

कंपनीकडून काही मदत आपल्याला मिळणार आहे आणि काय मदत हवी आहे, हे विचारण्यासाठी कंपनीचे लोक शाळेपर्यंत आले आहेत, हा सगळाच अनुभव त्यांना नवीन होता. त्या म्हणाल्या, ‘हा तर उलटा अनुभव आहे, साहेब! एरवी आम्ही दानशूर लोकांकडे जातो. एकदा नाही तर दहादा जातो. आज तर प्रिसिजन कंपनीसारखा दाता स्वतः शाळेपर्यंत येतो काय आणि आम्हाला काय देऊ हे विचारतो काय. सगळंच कल्पनेच्या पलिकडे आहे.’ बोलता बोलता त्यांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

आमचं बोलणं संपेपर्यंत, सर्वेक्षणाचा फॉर्म भरेपर्यंत संध्याकाळचे सात वाजले होते. चांगलाच अंधार पडला होता. तरीही आज मुख्याध्यापिकेला घरी जाण्याची घाई नव्हती. तिथून बाहेर पडेपर्यंत संगदरी गावात प्रिसिजनची गाडी आल्याची बातमी पसरलीच होती. त्यामुळे प्रिसिजनचे सातआठ कर्मचारी घोळका करून गाडीजवळ थांबलेच होते. आपल्या गावातल्या शाळेला आपली कंपनी मदत करणार, याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.




# ऊर्दू कि मराठी?

आहेरवाडी हे एक दक्षिण सोलापूर तालुक्यातलं छोटंसं गांव.  शाळेचा परिसर सुंदर. कम्पाऊंड वॉल. पक्की दगडी इमारत. प्रवेश केल्यानंतर समोर जे ऑफिस दिसलं तिथे आमची टीम घुसली.

मुख्याध्यापक कुठे बाहेरगावी गेलेले होते. तिथल्या तंत्रस्नेही शिक्षकाने पुढाकार घेऊन शाळा दाखवली. वर्गखोल्या पाहिल्या. संगणक संच आम्हाला गरजेचा आहे, असंही त्यानं सांगितलं. तिथून निघताना गेटजवळ ऊर्दू माध्यमाच्या खोल्या दिसल्या. तिथल्या शिक्षकांचीही धडपड चालू होती. त्यांनाही काही मदत हवी होती. पण पटसंख्या फारशी नसल्याने त्यांना काही देण्याचा विचार आम्ही केला नाही. बाहेर पडता पडता त्या शिक्षकाचं अस्पष्ट वाक्य कानावर आलं. 'भुकेल्या पोटी चार घास जाऊ द्या..ज्यांची पोटं भरली त्यांना अन्नाची किंमत राहात नाही..' त्या वाक्याचा अर्थ नंतर समजला. तिथं एनटीपीसीचं युनिट सुरू झाल्यानं एनटीपीसीकडून आसपासच्या गावांसोबतच शाळेलाही भरीव आर्थिक मदत मिळाली. सौरदिव्यांसह खूप काही मिळालं.

मदतीचंही कधी कधी अजीर्ण होतं. तशी त्या शाळेची अवस्था झालेली. मराठी माध्यमाचे शिक्षक, मुख्याध्यापक थोडे राजकीय मुशीतून तयार झालेले. बिचाऱ्या ऊर्दू माध्यमाच्या शिक्षकांना कुणी विचारेनासे झालेले. ऊर्दू माध्यमाला संगणक संच देणंच योग्य ठरलं असतं अशी परिस्थिती निर्माण झाली. एक धडा आम्हालाही मिळाला. तो म्हणजे पटसंख्येपेक्षा धडपडणारे शिक्षक आणि गरज एकत्र असेल तरच मिळालेल्या मदतीचा पूर्ण विनियोग होतो!




# कासेगांवची नारी शक्ती

कासेगाव तसं मोठ्ठं गांव. यात्रा, जत्रांमुळे प्रसिध्दीस आलेलं. तिथल्या जि. प. शाळेत सगळ्या महिला शिक्षिकाच आहेत. त्यांनी लोकसहभागातून काही संगणक जमवले. दुसऱ्या एका वर्गात आणखी संगणक मिळाल्यास ते ठेवण्याची तरतूदही करून ठेवली होती.

तिथल्या श्रीमती कट्टिमनी नावाच्या मुख्याध्यापिका स्वतःच्या आजारपणावर मात करत शाळेसाठी धडपडत होत्या. त्यांच्या जिद्दीला सलामच केला पाहिजे. 'प्रिसिजनसारखी सोलापूरची मोठी कंपनी आम्हाला मदत करतेय. मग गांवकऱ्यांनी नको का काही करायला ?..' असा विषय मांडत त्यांनी अनेक कामं गावकऱ्यांच्या मदतीने पूर्ण केली. प्रिसिजनने पहिल्या टप्प्यात तीन संगणक, प्रिंटर अशा वस्तू दिल्या तर दुसऱ्या टप्प्यात ई-लर्निंग कीट दिले. तिथे काही तंत्रस्नेही शिक्षिका आहेत. त्यांच्या पुढाकाराने आणि सततच्या पाठपुराव्यामुळे ई-लर्निंग किट व्यवस्थित चालू आहे. सगळ्या महिला शिक्षिकांनी मिळून त्या शाळेला एक छान रूप दिलंय. ती शाळा आयएसओ मानांकन प्राप्त आहे, हे वेगळं सांगायला नकोच!



# खडकी पहिली शाळा

सोलापूरपासून साधारणतः २५ किमीवर खडकी हे गांव येतं. सोलापूर आणि उस्मानाबाद जिल्ह्याच्या हद्दीवरचं गांव. प्रिसिजनसाठी हे तसं महत्वाचं गांव. आपलं वाटावं असं. कारण याच छोट्या गावातली २२-२५ तरूण पोरं कंपनीत कामाला आहेत. सगळी अत्यंत कष्टाळू आणि विनम्र.

याच कर्मचाऱ्यांनी पहिल्यांदा आग्रह धरला की आपल्या कंपनीने आमच्या गावातल्या शाळेला काही मदत करावी. एल.सी.डी. प्रोजेक्टर द्या, अशी स्पेसिफिक मागणी त्यांनी केली होती. त्याला कारणही तसंच होतं. प्रिसिजन'चा कर्मचारी शाळेच्या व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष होता. त्याच्या कार्यकाळात शाळेसाठी काही भरीव मदत करण्याची त्याची इच्छा होती. गावाचा शाळेला खूप आधार असल्याचे दिसत होते. पण गावात सगळेच शेतकरी किंवा कामगार, शेतमजूर. कोण कुणाला कशी मदत करणार असाच प्रश्न होता. पण शाळा चांगली झाली पाहिजे, कारण आपली मुलं याच शाळेत शिकतात, ही भावना मनात ठेवून सगळ्यांची धडपड चालू होती.

हे जसं खडकीच्या बाबतीत आहे, तसंच इतर गावांच्याबाबतीतही असू शकतं. भलेही प्रिसिजनचे कामगार अग्रेसर असतीलच असे नाही. पण अशीच गावं निवडण्यासाठीची एक दिशा आमच्या नजरेसमोर येत गेली! आपले कामगार असलेली गावं निवडण्याची प्रेरणा प्रिसिजनला मिळाली ती याच प्रसंगातून!



# गावांची निवड आणि मदतीचं स्वरूप

प्रिसिजनचे कामगार ज्या गावातून येतात, तेथील जिल्हा परिषदेच्या शाळांना मदत करायची हे उद्दिष्ट ठरले. कंपनी परिसरापासून २५-३० किमीच्या परिघातील गावांची नावं काढली. खडकी, वडजी, कासेगांव, धोत्री, संगदरी, होटगी, बंकलगी, आहेरवाडी, शिंगडगांव, अंबिकानगर, बाळे, खंडोबा मंदिर बाळे तसंच सोलापूरातील दोन शाळांची निवड केली.

नेमकी काय मदत करायची हा प्रश्न बाकी होता. आम्ही अचानक शाळेला भेट देत असू. कंपनीची गाडी दिसली की कुतुहलाच्या नजरा आमच्यावरून फिरायच्या. मुख्याध्यापकांच्या ऑफिसमध्ये प्रवेश करेपर्यंत उत्सुकता ताणलेली असायची. प्रिसिजनची मदत काय असणार याचा अंदाज न आल्यानं आपण काय मागायचं याचं गणित शिक्षकांना जमायचं नाही. 'आम्हाला दोन खोल्या कमी पडतात त्या बांधून द्याल का...आम्हाला स्टेशनरीचा खर्च द्याल का...' अशा मागण्या समोर आल्या. प्रत्येक शाळेच्या गरजा वेगळ्या होत्या आणि परिस्थिती वेगळी होती. पण या सगळ्यांच्या मागण्यात एक समानता होती. कोणीही विचारपूर्वक काही मागत नव्हते! आपल्याला नेमकं काय हवंय, मुलांसाठी काय उपयुक्त ठरेल याचा विचार केलेला नव्हता आणि निर्हेतुक, निरूपयोगी काहीतरी देणं प्रिसिजनला रूचणारं नव्हतं. सर्वेक्षण फॉर्ममधील सगळ्या मागण्यांचा विश्लेषण केल्यानंतर लक्षात आलं की, काही शाळांनी संगणक संच आणि एल.सी.डी. प्रोजेक्टरची मागणी केली आहे. त्यामुळे काही शाळांना संगणक संच आणि एल. सी. डी. प्रोजेक्टर देण्याचा विचार केला.




# दोन शाळांना भौतिक सुविधा

होटगी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेला शौचालयाची आवश्यकता होती. तसंच शिंगडगांव येथील स्वामी विवेकानंद प्रशालेत सर्व वर्गखोल्यांमध्ये फरशीकरण करण्याची गरज होती.

स्वामी विवेकानंद प्रशाला ही जरी खाजगी संस्थेची शाळा असली तरी संस्थाचालकांना कोणतेही पाठबळ नव्हते आणि राजकीय पार्श्वभूमी नव्हती. शिवाय आसपासच्या आठ-दहा किलोमिटरच्या परीघात मोठी शाळा नसल्याने भौगोलिक महत्वही होते. म्हणून मदत करण्यासाठी या शाळांची निवड केली. दोन्ही ठिकाणच्या गरजांची तीव्रता लक्षात घेऊन या सुविधा पुरविण्याचा निर्णय घेतला. होटगी येथील जिल्हा परिषदेच्या कन्नड, मराठी आणि ऊर्दू अशा तिन्ही माध्यमांच्या शाळा एकाच आवारात आहेत. परस्परांमध्ये समन्वयाचा अभाव आहे. त्याहीपेक्षा संधी मिळेल तेंव्हा एकमेकांवर कुरघोडी करण्याचीच मानसिकता अधिक जाणवली.




# बारा शाळांचे इन्स्टॉलेशन

शाळांची निवड प्रक्रिया पूर्ण होऊन संगणक संच आणि एल.सी.डी. प्रोजेक्टरची खरेदी झाली. आता त्या त्या शाळांमध्ये जाऊन इन्स्टॉलेशन करणं आवश्यक होते.

कंपनीतल्याच ईडीपी टीमला सोबत घेऊन हे करायचं होतं. प्रोजेक्टर, कॉम्प्युटर, स्पिकर, प्रिंटर आणि संलग्न साधनांचं शाळांनुसार वर्गीकरण करणं, त्यांचे मॉडेल नंबर घेऊन ठेवणं, गावांच्या मार्गानुसार वाहतुकीचं नियोजन करणं, प्रत्येक शाळेमध्ये आवश्यक इलेक्ट्रीफिकेशन झालं आहे का ते पाहणं, त्या त्या शाळांना पूर्वकल्पना देऊन प्रत्यक्ष इन्स्टॉलेशनला जाणं आणि इन्स्टॉलेशन झाल्यानंतर सर्व शिक्षकांना त्याचं प्रशिक्षण देणं. एवढी प्रक्रिया पार पाडायची होती.

पूर्वतयारीसाठी चार दिवस आणि प्रत्यक्ष इन्स्टॉलेशनसाठी सहा दिवस याप्रमाणे एकूण चार माणसांचे १० दिवस लागले. एकूण प्रक्रिया वेळखाऊ होत असल्याचे लक्षात आलं. प्रिसिजनच्या देणगीबद्दल काही शाळांचा उत्स्फुर्त तर काही शाळांमध्ये थंडा प्रतिसाद होता. काही शाळांनी गावकऱ्यांना एकत्र करून उद्घाटनाचा जंगी कार्यक्रम घडवून आणला. काही शाळांमध्ये एखादाच शिक्षक थांबून इन्स्टॉलेशन समजून घेत होता. बाळे येथील शाळेत नियोजित वेळेपेक्षा तीन तास उशिर होऊनही मुख्याध्यापिका थांबलेल्या होत्या.

यात दोन गोष्टी शिकता आल्या. एक, शाळा केवळ आपल्या कामगारांच्या गावातली हवी एवढा निकष पुरेसा नव्हता. त्या शाळेत धडपडणारे शिक्षक आहेत का, हे पाहणं गरजेचं आहे. दुसरं, शाळेला गावाचा आधार आहे का, शाळा व्यवस्थापन समिती क्रियाशील आहे का, हे पाहणंही गरजेचं आहे.



# सर फाऊंडेशन

प्रिसिजनच्या माध्यमातून करावयाच्या सामाजिक कामाचा पहिला टप्पा मार्च २०१५ च्या अखेरीस संपला. नव्या आर्थिक वर्षात प्राथमिक शिक्षणासाठी काही भरीव करायचं असेल तर आणखी रचनात्मक दृष्टीकोन ठेवून संघटित प्रयत्नांची गरज होती.
प्रिसिजन ही उत्पादक कंपनी असल्याने दैनंदिन शैक्षणिक वातावरणाशी संबंध असण्याची शक्यताच नव्हती. शिवाय, दिलेल्या शैक्षणिक साहित्याचा वापर होतोय का, शैक्षणिकदृष्ट्या ते पुरेसं आहे का याचा अंदाज येत नव्हता. याच दरम्यान 'माझी शाळा : गुणवत्तापूर्ण शाळा' या नावानं एक लेखमाला दैनिक 'सकाळ'मध्ये येत होती. दररोज एका शाळेची माहिती आणि छायाचित्रे प्रकाशित होत असत.
त्यातूनच 'सर फाऊंडेशन'विषयी माहिती मिळाली. सर फाऊंडेशन ही राज्यातल्या धडपडणाऱ्या आणि सृजनात्मक काम करणाऱ्या शिक्षकांची स्वयंसेवी संस्था आहे. एकमेकांच्या सकारात्मक प्रयोगांची देवाणघेवाण करत या शिक्षकांनी आपापल्या शाळांमध्ये नवचैतन्य निर्माण केलं आहे. सिध्दाराम माशाळे आणि बाळासाहेब वाघ या दोन शिक्षकांनी गेली दहा वर्षे ही संस्था अनेक शैक्षणिक प्रयोगांनी सफल करत शिक्षणाभिमूख केली. महाराष्ट्रभरातील शिक्षक या चळवळीशी जोडलेले होते. आय.आय.एम. अहमदाबाद आणि सर फाऊंडेशन यांनी अनेक शैक्षणिक उपक्रम संयुक्तपणे राबविलेले होते.
दोन्ही शिक्षक प्रिसिजनशी चांगलेच परिचित होते. कंपनी आपला सामाजिक उत्तरदायित्व निधी प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करू इच्छिते याची कल्पना त्यांना दिली. एकत्रितपणे काही काम करता येऊ शकतं का, याची चाचपणी करण्याची ही वेळ होती.



# पाष्टेपाडा शाळेची भेट

ठाणे जिल्ह्यातील शहापूरपासून ४०-४५ किमी अंतरावर वसलेला एक छोटासा पाडा. सभोवतालच्या डोंगररांगांनी वेढलेला. पावसाची संततधार चालू होती. डोंगरवाटा ओलांडित गेल्यावर एका छोट्याशा वळणावर चाळीसएक कौलारू घरांची वस्ती लागते. त्यातल्याच एका अरूंद रस्त्यावर 'जिल्हा परिषद प्राथमिक डिजिटल शाळा, पाष्टेपाडा' या नावाची पाटी दिसायला लागते.

गेटच्या या चिमुकल्या कमानीतून तुम्ही आत जाता. साधारणतः तीनएक कौलारू खोल्या, समोर व्हरांडा, कंपाऊंड वॉललगत फुलांनी डवरलेली झाडे, स्वच्छ गणवेषातील लहानशी मुलं गुलाबाची फुलं देऊन सुहास्यवदने स्वागत करत होती. वर्गात पाऊल टाकताच एखाद्या चित्रपटाच्या स्टुडिओमध्ये गेल्याचा भास व्हावा असं वातावरण. एकदोन मुलं केबलची जोडणी करतायत, कुणी टॅबचं चार्जिंग झालं की नाही ते पाहतंय, कुणी प्रोजक्टर लावतंय, कुणी लॅपटॉप जोडतंय तर कुणी व्हीडिओ रेकॉर्डिंगच्या तयारीत, कुणी आमच्यासाठी पाण्याचे ग्लास घेऊन उभं आहे. सगळं अगदी चित्रातल्यासारखं सुबक आणि रेखीव.

आम्ही स्थिरस्थावर झाल्यानंतर मुलं समोरच्या पांढऱ्या फळ्यावर इलेक्ट्रॉनिक पेननं लिहितायत, चित्रं काढतायत, गणितं सोडवतायत...केलेलं काम आपापल्या नावानं सेव्ह करून ठेवतायत...पुढचा विद्यार्थी एखादी चित्रफीत लावतोय आत्ता ज्या पांढऱ्या फळ्यावर गणितं सोडवली तोच फळा एखाद्या चित्रपटगृहातल्या पडद्यासारखा बनतोय, अन् सगळी आकाशगंगा आमच्यासमोरच्या पडद्यावर अवतरतेय. एका जादुई दुनियेत गेल्यासारखा तो अनुभव म्हणजे 'ई लर्निंग'! सर फाऊंडेशनच्या माध्यमातून संदीप गुंड या तंत्रस्नेही शिक्षकाबद्दल माहिती मिळाली. पाष्टेपाड्यावरची ही शाळा या सगळ्या डिजिटल क्रांतीमुळे महाराष्ट्राच्या नकाशावर पोहोचली होती. सिध्दाराम माशाळे, बाळासाहेब वाघ हे दोन शिक्षक आणि दैनिक सकाळ, सोलापूरचे सहयोगी संपादक अभय दिवाणजी यांच्यासमवेत हा थक्क करणारा डिजिटल शाळेचा अनुभव घेतला. एक पांढरा फळा, प्रोजेक्टर, आय.आर. कॅमेरा, लॅपटॉप, इलेक्ट्रॉनिक पेन एवढ्याशा साधनांवर डिजिटल शिक्षणाचा तो सुंदर अविष्कार पाहता आला.

दृक्‌श्राव्य शिक्षणाचा पगडा दीर्घकाळ राहणारा असतो. यामुळं मुलांचा आत्मविश्वास वाढतो. शिकण्यातली गोडी वाढते. परिणामी मुलांची शाळेतील उपस्थिती वाढते. कारण शिकण्याचं माध्यम मुलांना आकर्षित करणारं आहे. मुलांच्या मूलभूत संवेदना आणि क्षमतांचा विकास करण्यासाठी लिहिणं, वाचणं यासारख्या बाबींवरही तितकाच भर देणं गरजेचं आहे. म्हणून दररोज एक तास एका वर्गासाठी ई लर्निंग पध्दतीनं शिकवलं जातं.



# दिशा सापडली

ई लर्निंगचा एक उत्तम नमुना पाष्टेपाडाने आम्हाला दाखवला होता. अत्यंत आटोपशीर आणि उपयुक्त असं ते मॉडेल होतं. सोलापूर जिल्ह्यातील शाळांसाठी तरी ते अद्भूतच होतं.

सर फाऊंडेशनच्या मदतीने ई लर्निंग प्रकल्पातील संभाव्य शाळांची यादी तयार केली. सगळ्या शाळांचं सर्वेक्षण केलं. ज्या शाळांची निवड केली त्यांना दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजी सोलापुरातल्या आय.एम.ए. हॉलमध्ये एकत्र बोलावलं. प्रिसिजनच्या माध्यमातून नेमकं काय करणार आहोत, ई लर्निंग सुविधा काय आहे, या सुविधेचा वापर कसा करायचा, त्यासाठी पूर्वतयारी काय करावी लागेल अशा विषयांवर चार तासांचं ओरिएण्टेशन दिलं गेलं. एक अद्भूत तंत्रज्ञान आपल्या शाळेत येणार याची उत्सुकता निर्माण करण्यासाठी या प्रशिक्षणाचा उपयोग झाला. ४० शाळांमधील जवळपास १२० शिक्षक या पहिल्याच कार्यशाळेला हजर होते. शिक्षकांचा प्रिसिजनसोबतचा हा पहिला कार्यक्रम होता. ई लर्निंग प्रकल्पाची दिशा सापडली होती.




# प्रशासनाची साथ

जिल्हा परिषद आणि सोलापूर महानगरपालिका तसंच राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या आणि विशिष्ट वस्त्यांमध्ये काम करणाऱ्या काही खाजगी शाळांचे सर्वेक्षण करून त्यातील ४० शाळा ई लर्निंगसाठी निवडल्या. हा प्रकल्प जर दीर्घकाळापर्यंत राबवायचा असेल तर याला प्रशासनाची साथ असणंही गरजेचं वाटलं.

प्रशासनाला सोबत घेऊन हा प्रकल्प राबविल्यास याची उपयुक्तता वाढेल, परिणामकारकता वाढेल असा विचार केला गेला. त्यासाठी जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अरूण डोंगरे यांची समक्ष भेट घेऊन या ई लर्निंग प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली आणि प्रशासकीय पातळीवर सहकार्याची विनंती केली. त्यांचा प्रतिसाद आमचा उत्साह वाढवणारा होता. सोलापूर जिल्ह्यातल्या सगळ्या शाळांचं रूप बदलण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. दिनांक २८ ऑक्टोबर २०१६ रोजी प्रातिनिधीक स्वरूपात काही शाळांना ई लर्निंग किटचं वाटप करण्यात आलं. अरूण डोंगरेंच्या रूपाने एक चांगला, कार्यक्षम, शिक्षणाविषयी आस्था असणारा प्रशासकीय अधिकारी भेटला. सर्व शाळांना, मुख्याध्यापकांना, केंद्र प्रमुखांना, शिक्षणाधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देऊन या प्रकल्पाला त्यांनी सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका घेतली. प्रशासनातील अधिकारी संवेदनशील आणि व्यापक दृष्टीकोन बाळगणारा असेल तर खूप मोठा फरक पडतो, याचा अनुभव आम्ही घेतला.




# इन्स्टॉलेशन

मागच्या १२ शाळांमध्ये प्रोजेक्टर आणि कॉम्प्युटर लॅबचं इन्स्टॉलेशन प्रिसिजनच्या ईडीपी टीमने केलं होतं. आता ई लर्निंग किटचं इन्स्टॉलेशन या प्रकल्पाचे पुरवठादार राजेश चासकर (रजत कॉम्प्युटर्स, कल्याण) यांच्याकडेच होतं.

त्यामुळे आमच्यावरचा बोजा थोडा हलका झाला. सगळ्या शाळांचंही काही योगदान असावं या हेतूने प्रत्येक शाळेने आपल्याला लागणारे ४ बाय ६ फूट आकाराचे व्हाईट बोर्डस् आपणच मिळवावे अशा सूचना आम्ही दिल्या. हे एक छोटं पाऊल त्यांनी टाकायचं होतं. काही शाळांमध्ये शिक्षकांनीच वर्गणी गोळा केली आणि बोर्ड खरेदी केला. जिथे दोनच शिक्षक आहेत तिथे शाळा समितीनं योगदान दिलं.



# शेटेवस्तीची शाळा!

शेटेवस्ती. सोलापूर शहरालगतची छोटी वस्ती. शंभर-सव्वाशे झोपड्या. त्यातल्याच एका चार पत्र्यांच्या झोपडीत जिल्हा परिषदेची शाळा भरते. शाळेत पाय ठेवल्याशिवाय तिथे शाळा असल्याचं कळतही नाही.

पाचही बाजुंनी पत्रे. सामान्य उंचीच्या माणसाने सरळ उभं राहण्याचा प्रयत्न केला तरी पत्रे डोक्याला लागतील एवढीच उंची. इनमिन ३ खोल्या. पहिली ते चौथीपर्यंतची शाळा. ४०-४५ विद्यार्थी. दोन शिक्षक. ही सगळी शाळा एका नाल्यावर उभी केलेली. पावसाळ्यात पाण्याबरोबर साप, विंचूही वर्गात येतात. चिखल पाण्यात शाळा बुडालेली असते. त्यातल्याच एका पार्टीशनमध्ये अंगणवाडी आणि माध्यान्ह भोजन शिजवण्याची जागासुध्दा! गंमत म्हणजे गेली ५० वर्षे ही शाळा तिथे भरतेय म्हणे. स्वातंत्र्यानंतरच्या ७० वर्षानंतरही प्राथमिक शिक्षणाची ही अवस्था!

परवेझ शेख आणि वैशाली कार्वेकर हे दोन शिक्षक तिथे काम करतात. भन्नाट काम करतात दोघंही. सगळ्या मुलांचे पालक रोजंदारीवर जाणारे. घरात कोणतीच अनुकूलता नाही. शाळा अशी. तरीही विद्यार्थ्यांची गुणवत्ता, चुणचुणीतपणा, त्यांच्या डोळ्यातली चमक इथे येणाऱ्या प्रत्येकाला नवा आशावाद देऊन जाते. मुलांचं वाचन, लिखाण, पाठांतर, गणित आणि इंग्रजीसारख्या विषयातली तयारी, मुलांची वैयक्तिक स्वच्छता, टापटीप सगळंच विलक्षण! कोणती निष्ठा, कोणती जिद्द, कोणता ध्यास घेऊन हे दोघे शिक्षक काम करत असतील असा प्रश्न पडतो! परवेझ शेख सरांनी या मुलांसाठी एक बचत बँक सुरू केलीय. घरातून, वेगवेगळ्या कारणांनी हाती मिळालेले खाऊचे पैसे साठवून ही बँक चालते. ई लर्निंगसाठी जेंव्हा व्हाईट बोर्ड खरेदी करण्याची वेळ आली तेंव्हा पैसेच नव्हते त्यांच्याकडे. थोडं व्यथित होऊनच दोन्ही शिक्षक बसलेले. व्हाईट बोर्ड नाही बसवला तर ई लर्निंगचं किट मिळणार नाही. हाती आलेली संधी निघून जाईल. पालकांकडे तरी कसं मागणार? त्यांचंही हातावरचं पोट. अशा चिंतेत असतानाच प्रज्ञा नावाच्या एका चिमुरड्या विद्यार्थीनीने सांगितलं 'सर, शाळेसाठीच बोर्ड घ्यायचा आहे नां? मग आमच्या बचत बँकेतले पैसे घ्या ना!' एका छोट्या विद्यार्थीनीच्या या वाक्याने परवेझ सरांना हुरूप आला. दिलासा वाटला आणि आश्चर्यही वाटलं. तिसरी-चौथीच्या मुलीमध्ये ही समज आली कुठून? नकळतपणे झालेल्या संस्कारांचं ते फलित होतं!

जून २०१८ मध्ये पावसाच्या तडाख्यात शेटेवस्तीच्या शाळेची पार दुर्दशा झाली. पण परवेज शेख, वैशाली कार्वेकर हे दोन्ही शिक्षक चिमुकल्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन जिद्दीनं कामाला लागले. लोकसहभागातून आणि प्रिसिजन फाऊंडेशननं दिलेल्या अर्थसहाय्याच्या बळावर त्यांनी शाळा पुन्हा उभारली. न खचता स्वावलंबनाचे धडेच इथल्या चिमुकल्यांनी गिरवले.



# मनपा शाळा क्र २८

सोलापूर महानगरपालिका मराठी शाळा क्रमांक २८. विजापूर रस्त्यावर असलेली शाळा कधीकाळी दोनशे-अडीचशे विद्यार्थ्यांनी गजबजलेली असायची. अनेक कारणांनी शाळेचा पट घसरून अवघ्या १०-१२ विद्यार्थी संख्येवर येऊन पोहोचला.

परमेश्वर सुतार आणि गौरीशंकर नारायणे हे दोन तरूण शिक्षक तिथे बदली होऊन आलेले. पट होता जेमतेम दहा. एकूण दहामध्ये रोजची उपस्थिती किती असेल? या दोघांनी चंग बांधला. शाळेचं रूप बदलायचं. पट वाढवायचा. शाळेला पुन्हा गतवैभव प्राप्त करून द्यायचं. दोघांचा एक निश्चय. एक विचार. एक ध्यास. आसपासच्या वस्तीमध्ये फिरून मुलं जमवली. पदरमोड करून मुलांसाठी रिक्षा लावली. सुट्टीच्या दिवशी दोघांनीच शाळा रंगवून काढली. लोकसहभाग मिळवायला सुरूवात केली. गणवेश मिळवला. एक वर्षाच्या अखंड मेहनतीने शाळेचा पट १० वरून शंभरावर पोहोचला. शाळेतला किलबिलाट वाढला. विविध उपक्रम राबवले.

सगळे पालक रोजंदारी करणारे, दगड फोडणारे, लिंबूमिरची विकणारे. पालकांना शाळेत बोलावून घेतलं. मुलांची हुशारी दाखवली. लोकसहभागातून एक प्रोजेक्टर मिळवला. काही टॅब मिळवले. ज्या घरात दोन वेळच्या जेवणाची भ्रांत, त्या घरातल्या मुलांचं भवितव्य या शाळेत घडायला लागलं. मुलं टॅबवर आणि प्रोजेक्टरवर शिकू लागली. सुतार सर आणि नारायणे सर या दोघांच्या मेहनतीची दखल घेऊन अनेक लोकांनी त्यांना सहकार्य करायला सुरूवात केली. पाहाता पाहाता शाळा पुन्हा बाळसं धरू लागली!




# पोखरापूर

मोहोळहून पंढरपूरला जाताना पोखरापूर लागतं. मोठाल्या झाडांची दाट सावली रस्त्यावर पसरलेली असल्यानं हे गांव प्रवाशांच्या चांगलंच लक्षात राहातं.
अगदी कोपऱ्यावर जिल्हा परिषदेची शाळा आहे. गेटमधून आत गेल्याशिवाय या शाळेची गंमत कळत नाही. स्वच्छ. निटनेटकी. शांत. लाल मातीचं समोरचं छोटंसं, आटोपशीर मैदान, व्हरांडा. मुलांच्या उंचीला यईल अशा स्टॅण्डवर वृत्तपत्र अडकवलेलं. एका वर्गाच्या समोर ध्वज लावलेला दिसला. तो 'उपस्थिती ध्वज' होता. ज्या वर्गाची उपस्थिती शंभर टक्के, त्या वर्गासमोर हा ध्वज! प्रयोगशाळा, रचनावादी शिक्षणाचं साहित्य. प्रत्येक विद्यार्थ्याची स्वतंत्र फाईल वर्गात ठेवलेली. भिंतीवर दोरीच्या सहाय्याने पुस्तकं अडकवलेली. तो वाचन कोपरा! महादेव इटेकर हे तिथले मुख्याध्यापक. काही मुलांची हस्ताक्षरं पाहिली. अगदी मोत्यासारखी!
शाळेच्या पाठीमागील परिसरात लोकवर्गणीतून फरशीकरण करून घेतलं. त्यामुळं ती जागा वापरात आली. मुलांना माध्यान्ह भोजनासाठी स्वच्छ आणि सावलीचं अंगण मिळालं. पोखरापूरसारख्या छोट्या गावातही लोकांचा मिळणारा प्रतिसाद खूप चांगला वाटला. ई लर्निंग किटचं इन्स्टॉलेशन चालू असताना शिक्षकांनी केलेली धावपळही लक्षात राहिली. आपल्या शाळेत नवं काही तरी येऊ घातलंय, याची उत्सुकता ते लपवूच शकत नव्हते!




# तामडागचं वेगळेपण

मोजून दोनतीन खोल्या. उरलेले सगळे वर्ग पाठीमागच्या झाडाखाली भरलेले. झाडांची भरगच्च सावली. त्यात बागडणारी मुलं. शांतिनिकेतनसारखं चित्र होतं ते.

मोहोळ तालुक्यातली तामडागची शाळा छान रंगवलेली. अख्खं जंगलबुक शाळेच्या भिंतीवर उतरलेलं. अरविंद भंडारे हे तिथले उत्साही शिक्षक. सगळी शाळा त्यांनी स्वतः हाती ब्रश घेऊन रंगवून काढली. आमचं बोलणं चालू असताना एक फेटेवाले गृहस्थ तिथे आले. म्हणाले, 'तुमी साहेब लोक नुसतं येता आणि जाता. जागेचं काय करताव का नाही?' त्यांना वाटलं की आम्ही जिल्हा परिषदेचे किंवा शासनाचे अधिकारीच आहोत. या गृहस्थाने स्वतःची जमीन शाळेसाठी दिली. म्हणून या दोनतीन खोल्या तरी दिसतायत! शिक्षकांनी माहिती पुरवली.

पापरी ते खंडाळी आणि खंडाळी ते इंगोलेवस्ती या रस्त्याची दुरवस्था आपल्याला स्वातंत्र्यपूर्व काळातल्या स्थितीत घेऊन जाते. पावसाळ्यात रस्त्यावर तळे साचलेले. ट्रॅक्टरचे चाकदेखील रूतू शकेल असे खड्डे आणि पाणी. एकदीड किलोमिटर अशी वाट काढत गेल्यानंतर दाट झाडीत लपलेली जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा दिसते. इनमिन तीन खोल्या. बाजुलाच एक छोटंसं मंदिर. समोर झोके, सिसॉ, घसरगुंडी, झोपाळा. स्वच्छ गणवेशातली मुलं तुमच्याभोवताली गोळा होतात. हसतमुखानं अभिवादन करून शाळेत घेऊन जातात. रवि चब्हाण हे धडपडे शिक्षक. मुलांवर किती प्रेम असू शकतं याचं जितंजागतं उदाहरण. शाळेत वर्षभरात उपक्रमांची नुसती रेलचेल असते. ईलर्निंगचं किट ही त्यांच्यासाठी पर्वणी ठरली.



# अक्कलकोट तालुका

अक्कलकोट तालुक्यातील ई लर्निंग किटचे इन्स्टॉलेशन चालू होते. बॅगेहळ्ळी, कोन्हाळी, जेऊर आणि बबलाद अशा शाळांची निवड झालेली होती.
जेऊरमध्ये मराठी आणि कन्नड माध्यमाच्या शाळा एकाच कॅम्पसमध्ये आहेत. त्यातल्या मराठी शाळेची निवड या प्रकल्पासाठी केलेली. कोन्हाळी, बॅगेहळ्ळी, जेऊर येथील इन्स्टॉलेशन संपून बबलादच्या शाळेत पोहोचायला रात्रीचे साडेबारा वाजले होते. तरीही तिथले शिक्षक आणि मुख्याध्यापक अत्यंत उत्साही दिसत होते. बबलाद हे सोलापूर जिल्ह्यातलं शेवटचं गांव अगदी कर्नाटकच्या सीमेवर असलेलं. त्यामुळे कन्नड माध्यमाची शाळा. तिथले शरणप्पा फुलारी हे शिक्षक म्हणजे जणू उत्साहाचा अखंड झरा! गावातल्या लोकांशी अतिशय चांगला संपर्क. ते अनेक वृत्तपत्रांसाठी हौसेखातर पत्रकार म्हणूनही काम करतात. त्यामुळे अफाट जनसंपर्क. रात्री इन्स्टॉलेशनच्या वेळी सुतारकामाची निकड होती. तेंव्हा फुलारी सर तडक जाऊन रात्री साडेबारा वाजता गावतल्या सुताराला उठवून शाळेत घेऊन आले आणि ते काम पूर्ण झालं. शिक्षकांचा ओसंडून वाहणारा उत्साह, गावकऱ्यांची साथ पाहून आम्हाला आणि इन्स्टॉलेशन करणाऱ्या टेक्निकल टीमला पुन्हा हुरूप आला. सकाळी आठ वाजता पहिल्या शाळेत इन्स्टॉलेशन आणि रात्री एक वाजता शेवटच्या शाळेतले इन्स्टॉलेशन करून ७५ किलोमिटरचा प्रवास करून सोलापूर गाठलं. याचंही एक वेगळं थ्रील अनुभवलं.




# सर्व शाळांसाठी ट्रेनिंग

५२ शाळांचं इन्स्टॉलेशन पूर्ण झालं. दहाबारा दिवसांचा मोठा ड्राईव्हच होता तो. इन्स्टॉलेशनच्यावेळी काही जुजबी ट्रेनिंग दिलं गेलं. ई लर्निंग तंत्रज्ञान म्हणून आणि त्याचा अभ्यासक्रमात कसा उपयोग करता येईल अशा दोन्ही दृष्टीने प्रशिक्षण देणं गरजेचं होतं.

दिनांक २६ नोव्हेंबर २०१५ रोजी सोलापुरातल्या ॲम्फी थिएटरमध्ये सर्व शाळांमधल्या शिक्षकांचं दिवसभराचं ट्रेनिंग आयोजित करण्यात आलं. त्यासाठी प्रत्यक्षात तिथे ईलर्निंग किट बसवणे गरजेचं होतं. आदल्यादिवशी रात्री उशिरापर्यंत परवेझ शेख, सिध्दाराम माशाळे, राजकिरण चव्हाण आणि बाळासाहेब वाघ या शिक्षकांची धावपळ चाललेली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी ठीक ११ वाजता ट्रेनिंगला सुरूवात झाली. उदंड प्रतिसाद होता. संदीप गुंड स्वतः ट्रेनिंग द्यायला हजर होते. एखाद्या विषयातलं सखोल ज्ञान काय असतं आणि ते लोकांपर्यंत पोहोचवण्याची ऊर्मी काय असते याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे संदीप गुंड सर!

अध्यापनात ई लर्निंगचा किती बहुआयामी उपयोग करून घेता येतो याचं विश्वरूप दर्शनच गुंड सरांनी घडवलं. हे प्रशिक्षण म्हणजे एक जादुई सफर होती. ई लर्निंगमुळं अध्यापन करताना मुलांना आनंद देण्यात आणि स्वतः आनंद घेण्यात कितीतरी पटीने वाढ होणार आहे, याची प्रचिती सगळ्या शिक्षकांना आली. ट्रेनिंग संपल्यानंतरचं एकूण वातावरण भारावलेलं होतं हे नक्की!




# प्रकल्पाचे मूल्यमापन

ई लर्निंग प्रकल्प शाळांमध्ये कसा चालेल? तो कितपत नीट चालवला जाईल? शाळांचा प्रतिसाद कसा राहील? दिलेलं साहित्य नीट राखलं जाईल का? या पध्दतीचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर काय परिणाम झाला? त्याचं मूल्यमापन कसं करायचं, असे असंख्य प्रश्न होते. शिक्षणक्षेत्रातल्या दैनंदिन गोष्टींचा आम्हाला अनुभव नव्हता. प्रशासनाचा अनुभव नव्हता. त्यामुळं शिक्षणक्षेत्रातल्या तज्ज्ञ माणसानं या प्रकल्पाचं तटस्थपणे मूल्यमापन करणं गरजेचं होतं. प्रा. विलास बेत. शिक्षणक्षेत्रातलं एक आदरणीय नांव. अनुभव मोठा आणि प्रिसिजनशी परिचित असणारी, प्रिसिजनची कार्यपध्दती माहिती असलेली व्यक्ती. शिक्षकांशी सुसंवाद साधू शकतील असं व्यक्तिमत्व. दिनांक २६ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या पहिल्या विस्तृत कार्यशाळेमध्ये त्यांना आमंत्रित करण्यात आलं. तेंव्हापासूनच ते या प्रकल्पाशी जोडले गेले आणि त्यातून सुरू झाला एक संवाद. मुलांची गुणवत्ता, शिक्षकांचा पुढाकार, गावाचा सहभाग, पालकांचा सहभाग. ई लर्निंगच्या बरोबरीनं आणखी काय देऊ शकतो, ज्यामुळं मुलांची गुणवत्ता वाढेल अशा अनेक अंगांनी हा मुक्त संवाद सुरू झाला. छोट्या बैठकांमधून प्रकल्पातील शिक्षक, प्रिसिजनचे प्रतिनिधी आणि प्रा. विलास बेत सर असा तीनपदरी संवाद या प्रकल्पाला आणखी वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणार होता. प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्पातील शाळांची वाटचाल कशा पध्दतीने चालू आहे, त्यात नेमके काय बदल झाले, शाळेची पटसंख्या वाढली का, विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली का, शिक्षकांचं कौशल्य वाढलं का, कृतिशीलता वाढली का, गुणवत्तेत वाढ झाली का, अशा अनेक अंगानी या प्रकल्पाचं मूल्यमापन व्हायला हवं. पण मूल्यमापन शब्दामुळे आणि त्याच्या आजवरच्या वापरामुळे त्यामागची सृजनशीलता संपून तो केवळ रिपोर्टिंगपुरता उपचाराचा भाग राहू नये याकरिता मूल्यमापन हा शब्द न वापरता 'प्रतिसाद' हा शब्द वापरावा अशी एक सूचना शिक्षकांकडूनच आली. ही एका अर्थाने त्यांच्या मनस्वी सहभागाची पावतीच म्हणायला हवी!

प्रिसिजनच्या ई लर्निंग प्रकल्पात समावेश होण्यापूर्वी शाळेची स्थिति काय होती? नंतर ती काय झाली? शाळेमध्ये, शिक्षकांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये, पालकांमध्ये काय काय प्रकारचे बदल झाले याच्या नोंदी ठेवणे, त्याचं विश्लेषण करणे, झालेल्या बदलांच आणि आलेल्या सूचनांचं स्वागत करणे, या निमित्ताने पालक, व्यवस्थापन समिती, गांवकरी यांचा वाढलेला सहभाग नोंदवणे अशा अनेक अर्थाने हा 'प्रतिसाद' नोंदवण्याची एक पध्दत आकाराला येत होती.




# आपापसातील संवाद सुकर होण्यासाठी

शंभर शाळांमधील शिक्षकांचा आपापसातील संवाद वाढावा, एकमेकांच्या नवनव्या उपक्रमांची माहिती सगळ्यांपर्यंत पोहोचावी, एका शाळेतील एखादा चांगला प्रयोग सगळ्या शाळांपर्यंत पोहोचावा अशा अनेक अर्थाने संवाद वाढणे गरजेचे होते.

त्यासाठी सोशल मिडियाचा वापर करणे हा एक तातडीचा आणि लगेच हाताशी उपलब्ध असलेला मार्ग होता. 'प्रिसिजन ई लर्निंग प्रोजेक्ट' या नावाने व्हॉटस् ॲप ग्रुप सुरू केला. कालांतराने दोन ग्रुप करावे लागले. शिक्षकांचा उत्साह वाढला, शेअरिंग वाढलं. शाळांमधील कार्यक्रम, उपक्रम फोटोद्वारे, व्हीडिओद्वारे आणि शब्दांद्वारे सगळ्यांपर्यंत पोहोचू लागले. ज्या शाळांमधील शिक्षक अधिकाधिक ॲक्टीव्ह, तिथल्या उपक्रमाच्या पोस्ट भरभरून वाहू लागल्या. ज्या शाळांच्या पोस्ट कमी होत्या, त्यांच्यासोबत फोनद्वारे किंवा समक्ष भेटून शिक्षक मंडळीच चर्चा करायला लागली. संवाद वाढला, शेअरिंग वाढलं. माहितीची देवाणघेवाण वाढली. तसंच नकळतपणे स्पर्धात्मक वातावरण या शाळांमध्ये सुरू झालं. एवढं सगळं एका व्हॉटस् ॲप ग्रुपने केलं!



# प्रतिसाद

ई लर्निंग किट दाखल होण्यापूर्वीची स्थिती आणि नंतरची स्थिती या विषयावर सगळ्या शाळांसाठी एक स्पर्धा आयोजित करण्यात आली. आपापल्या कल्पकतेप्रमाणे त्यांना प्रेझेंटेशन द्यायचे होते. त्यासाठी ठराविक मुदत दिली गेली. दिनांक २ मे २०१७ रोजी सगळ्या शाळांचा एकत्रित कार्यक्रम आयोजित केला. त्याला नांव दिलं 'प्रतिसाद'!

याच कार्यक्रमात शाळांच्या प्रेझेंटेशन स्पर्धेची बक्षीसे देण्यात आली. उदंड प्रतिसादात आणि उत्साहात तो कार्यक्रम पार पडला. उपस्थित सर्व शिक्षकांचे काही गट तयार करून प्रत्येक गटाला एकेक विषय देण्यात आला. ई लर्निंगचा प्रभाव आणि परिणाम, पारंपारिक अध्यापन पध्दतीवर होणारा परिणाम, असे काही विषय देऊन चर्चासत्र घडवून आणले. प्रत्येक गटाच्या सादरीकरणासाठी वेळ दिला आणि सर्वोत्तम सादरीकरणासाठी उत्तम बक्षीसही दिले गेले. या कार्यक्रमाने शिक्षकांचा आपापसातील संवाद वाढला, अनुबंध वाढला. शाळेचं केंद्र, तालुका या पलीकडे जाऊन प्रिसिजन ई लर्निंग प्रोजेक्टमधील शाळांमधील एक 'शिक्षक परिवार' तयार झाला. यात कोणतीही सरकारी उतरंड नाही, प्रोटोकॉल सांभाळण्याचा विषय नाही, रिपोर्टिंगचा बडगा नाही. आहे ते केवळ आनंदी, नाविण्यपूर्ण, सृजनशील अध्यापनाचे समाधान!




# पुढच्या टप्प्यातील शाळांसाठी आधुनिक तंत्र

पहिल्या टप्प्यातील ५२ शाळा यशस्वीरित्या चालायला लागल्यानंतर या प्रकल्पाला चांगला आकार येतोय याची खात्री पटली. दरम्यान, ई लर्निंगमध्ये स्मार्ट बोर्ड वापरल्यास अधिक चांगला परिणाम होतो हे लक्षात आले.

पहिल्या टप्प्यातील ५२ शाळांना पांढऱ्या रंगातील प्लायवूडच्या बोर्डवर 'आय आर' (इन्फ्रारेड) कॅमेरा लावण्यात आलेला होता. त्यामुळे जास्तीचा प्रकाश पडला अथवा थोडा वारा आला तरी बोर्डाचे कॅलिब्रेशन निघून जात असे. या नव्या तंत्रात इन्फ्रारेड कॅमेराच्याऐवजी स्मार्ट बोर्डला इन्फ्रारेड सेन्सर लावलेले होते. त्यामुळे जास्तीचा आय आर कॅमेरा आणि त्यामुळे उद्भवणाऱ्या कॅलिब्रेशनच्या समस्या यापासून सुटका होणार होती. नवीन स्मार्टबोर्ड 'युजर फ्रेंडली' वाटत होता.

पहिल्या टप्प्यातील ५२ शाळांचं ज्या पध्दतीने सर्वेक्षण झालं, त्याच पध्दतीने या पुढच्या टप्प्यातील शाळांसाठी सर्वेक्षण करण्यात आलं. भौगोलिक व्याप्ती वाढवण्यापेक्षा आहे त्याच भौगोलिक परीघातील शाळांची निवड करायची होती. पण काही शाळांचं कर्तृत्व छानच होतं. अशा शाळांना प्रकल्पात घेणं आवश्यकच होतं. पूर्वीच्या टप्प्यात अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ आणि सोलापूर शहराचा समावेश होता. दुसऱ्या टप्प्यात या तालुक्यांशिवाय माढा हा तालुका वाढला.



# सर्वेक्षण आणि इन्स्टॉलेशनचे अनुभव

अक्कलकोट स्टेशनची शाळा. अत्यंत टुमदार इमारत. छोटीशी अंगणवजा मोकळी जागा. तिचाच क्रीडांगण म्हणूनही वापर करतात. अत्यंत उत्साही शिक्षकांची टीम इथे भेटली. शाळेची स्वच्छताही नजरेत भरणारी होती.

सोलापूर शहरातील काही खाजगी संस्थांच्या शाळा या टप्प्यात निवडल्या होत्या. त्याचं कारणही तसंच होतं. शहरातील संस्था असूनही अत्यंत मागासलेल्या वस्तीत काम करणाऱ्या या संस्था आहेत. पालकांना रोजच्या रोज काम मिळेल, रोजगार मिळेल याची कोणतीच शाश्वती नाही अशा या वस्त्या. शिक्षकांचं कौशल्य, मुलांना शिकवण्याची जिद्द, तळमळ यामुळेच या शाळांमध्ये मुलं शिकतायत. आपली मुलं कोणत्या वर्गात शिकतायत हे पालकांना माहितीही नसतं!

ज्ञानगंगा प्राथमिक शाळा, गजानन महाराज विद्यामंदिर, सोनामाता कन्या प्रशाला, सरस्वती विद्यामंदिर, कमला नेहरू प्राथमिक विद्यालय अशा काही शाळांची निवड आम्ही पुढच्या टप्प्यासाठी केली. सोलापूर महानगरपालिकेच्या आणखी काही शाळांची भर पडली.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या काही उत्तम शाळांचा सहभाग वाढला. चिंचपूर येथील जि. प. शाळा हा खरं म्हणजे स्वतंत्र कौतुकाचा विषय आहे. तिथे चालणारे विविध उपक्रम, शैक्षणिक प्रगतीसाठी केले जाणारे विविध प्रयोग पाहण्यासारखे, अनुभवण्यासारखे आहेत. तिथला पहिलीत दाखल झालेला विद्यार्थी काही महिन्यातच आठवी-दहावीची पुस्तके सहजपणे लिहूवाचू शकतो याचे आश्चर्य वाटते. मुलांना शिकवली जाणारी 'साईन लॅग्वेज', खुणांची भाषा वैशिष्ट्यपूर्ण आहे. जि.प. कवठा शाळेतला संगीतमय परिपाठ अनुभवण्यासारखा आहे तर कामती जि. प. शाळेतील प्रगत आणि अप्रगत विद्यार्थ्यांसाठी चालेले वेगवेगळे प्रयत्न लक्षवेधी ठरले. बोरामणी, मोहोळकर वस्ती, बक्षी हिप्परगे अशा काही प्रयोगशील शाळांचा सहभाग वाढला. आम्ही प्रिसिजनच्या माध्यमातून जो सागा स्मार्ट बोर्ड देणार होतो, अगदी तसाच स्मार्ट बोर्ड कणबस (गं) येथील जि. प. शाळेत आधीपासून अस्तित्वात होता. तोही लोकवर्गणीतून घेतलेला. विशेष म्हणजे या बोर्डाचा नियमित वापर केला जात होता! शाळेचा पट मोठा असल्याने त्यांना आणखी एका बोर्डाची आवश्यकता होती. या शाळेतील संगीत विभाग अत्यंत कार्यक्षम दिसला. गायन, वादन कलेमध्ये ही मुलं तरबेज दिसली.

मंगळवेढा तालुक्यातील माचणूर आणि मरवडे या दोनच गावातील जि. प. शाळांचा समावेश या टप्प्यात केला गेला. या दोन्ही शाळांचं वैशिष्ट्य म्हणजे लोकसहभाग चांगला होता. त्यातल्या त्यात मरवडे येथील शाळेला गावकऱ्यांचं पाठबळ चांगलं होतं.




माढा तालुक्यातील मोडनिंबची जिल्हा परिषद शाळा. रात्रीचे पावणे दोन वाजले होते. ई लर्निंग कीटचं इन्स्टॉलेशन संपत आलेलं होतं. त्या दिवशीच्या उद्दिष्टातील ही शेवटचीच शाळा होती. बाहेर पटांगणात शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य अजूनही बसलेले होते. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकांपेक्षा या गावकऱ्यांचा उत्साह दांडगा होता. सगळं गांव झोपलेलं असतानाही त्यांनी कुणातरी हॉटेलवाल्याला झोपेतून उठवून आमच्यासाठी चहा करायला लावला. पुढे जेंव्हा माढा तालुक्यातल्या शिक्षकांसाठी ई लर्निंगचं ट्रेनिंग तिथे आयोजित केलं, त्यावेळी कैलासदादा काटकर या पालकाने स्वतःच्या शेतातील झेंडूच्या फुलांनी अख्खा वर्ग, शाळेचा व्हरांडा सजवून काढला. अरण आणि व्होळे गावातील अनुभव जवळपास असाच होता. असे जागरूक आणि उत्साही पालक असले की, शाळेला खरा आधार मिळतो

मोहोळ तालुक्यातलं सय्यद वरवडे गांव. शाळा मोठी. मैदान मोठ्ठं. ई लर्निंग कीट ज्या वर्गात बसवायचं होतं तो वर्ग जरा छोटा होता. आम्ही सहज सुचवलं की, मधली भिंत पाडुन दोन्ही वर्ग जोडून घेता आले तर जास्त जागा उपलब्ध होईल. पुढच्या दोन दिवसात मधली भिंत पाडून फ्लोअरिंगचं काम चालू असल्याचे फोटो त्यांनी आम्हाला पाठवले. पुढच्या दोन दिवसात रंगकामही पूर्ण. अवघ्या आठ दिवसात एक सुसज्ज हॉल ई लर्निंगसाठी तयार होता. पालकांनी, गावकऱ्यांनी मनावर घेतलं तर काय जादू घडू शकते याचं ते उत्तम उदाहरण होतं.

या नव्या स्मार्ट बोर्डसह पुढच्या ४८ शाळांचंही इन्स्टॉलेशन ऑगस्ट २०१७ मध्ये पूर्ण झालं.



# ‘सागा स्मार्ट बोर्ड’ वापरासाठी प्रशिक्षण

४८ शाळांचं इन्स्टॉलेशन पूर्ण झालं. प्रश्न होता तो या शिक्षकांना नव्या तंत्राचं प्रशिक्षण कशा पध्दतीनं द्यायचं हा! पहिल्या टप्प्यात एकाच दिवशी एकाच हॉलमध्ये ई लर्निंगचं प्रशिक्षण दिलं गेलं. पण दुसऱ्या टप्प्यात भौगोलिक क्षेत्र वाढलेलं होतं आणि शिक्षकांची संख्याही मोठी होती. एकत्रित प्रशिक्षण देणं कितपत परिणामकारक होईल, याबद्दल शंका होती. म्हणून छोट्या गटांमधून प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला गेला. ६० ते ७० शिक्षकांची संख्या होईल असे सहा गट भौगोलिक रचनेनुसार बनवले गेले. याचे दोन फायदे झाले. एक, शिक्षक संख्या मर्यादित असल्याने वैयक्तिक लक्ष देऊन टेक्नॉलॉजी समजावून सांगणे सोपे गेले. दुसरा फायदा असा झाला की, ज्या शाळांमध्ये हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले त्या शाळांचा आयोजनात पुढाकार, सहभाग घेता आला. एखादा अपवाद वगळता या सर्वच शाळांनी अत्यंत उत्साहाने या प्रशिक्षणाच्या निमित्ताने प्रिसिजनला सहकार्य केलं. सोलापुरात स.हि.ने. सरस्वती मंदिर, महापालिका कॅम्पशाळा, अक्कलकोट येथिल शारदामाता शाळा आणि मोडनिंब येथिल जि.प. शाळा अशा चार ठिकाणी एकूण सहा प्रशिक्षण कार्यक्रम घेतले गेले. फोरटेक सोल्यूशन्स या सागा स्मार्ट बोर्डचा पुरवठा करणाऱ्या कंपनीच्या तंत्रज्ञांनी या प्रशिक्षणात वेगवेगळी उपकरणे, त्याची वैशिष्ट्ये आणि त्याचा अध्यापनात कशा पध्दतीने वापर करता येईल याविषयी मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणासाठी शिक्षकांचा सहभाग हा १०० टक्के महत्वाचा होता. त्यासाठी जिल्हा परिषद, महापालिकेच्या शिक्षण विभागाची परवानगी घेणं गरजेचं होतं. प्रिसिजनच्या या संपूर्ण शैक्षणिक प्रकल्पात प्रशासनाचं सहकार्य आणि कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभाग कसा राहिल, याचा प्रारंभापासूनच प्रयत्न केला. याही वेळेस जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी मा. संजयकुमार राठोड आणि महापालिकेच्या शिक्षणाधिकारी मा. सुधा साळुंके यांना समक्ष भेटून पत्राद्वारे कल्पना दिली. त्याशिवाय प्रशिक्षण काळात भेट देण्याची विनंती केली. यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांना प्रिसिजनद्वारे होत असलेल्या शैक्षणिक कार्याचा जवळून परिचय झाला. शिक्षकांनाही मोकळेपणाने प्रशिक्षणाचा आनंद घेता आला. यातून कंपनीचा सीएसआर अधिक परिणामकारक पध्दतीने वापरायचा असेल तर प्रशासनाचे सहकार्य आणि प्रत्यक्ष सहभाग महत्वाचा असतो, हे अधोरेखित झालं.




# प्रबोधन

ई लर्निंग प्रकल्पातील शाळांची संख्या आता शंभरच्या पुढे गेली होती. दोन वेगवेगळे तंत्रज्ञान वापरून हे ई लर्निंगचे किट दिलेले होते. पहिल्या ५२ शाळांना लाँग प्रोजेक्टर आणि इन्फ्रारेड कॅमेरा बसवून टच स्क्रीनचा अनुभव दिला तर दुसऱ्या टप्प्यातील ४८ शाळांना शॉर्ट थ्रो प्रोजेक्टर आणि सागा स्मार्ट बोर्ड देण्यात आला.

या दोन्ही प्रकारातील शाळांमधल्या सर्व शिक्षकांना एकाचवेळी एकत्र करून दिवसभराचे ओरिएन्टेशन देणे गरजेचे वाटले. यातून दोन गोष्टी साध्य करायच्या होत्या. एक, सर्वांना एकत्रित ई लर्निंगच्या वापराचं तंत्र आणि त्याचा अध्यापनात कसा उपयोग करता येईल हे सांगायचे होते. दुसरी गोष्ट, सर्व शिक्षकांना एकाचवेळी प्रिसिजनच्या धाग्याने जोडायचे होते. दिनांक ८ जानेवारी २०१८ रोजी 'प्रबोधन' या नावाने ही दिवसभराची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. एकूण ७९० शिक्षकांपैकी ६२५ शिक्षक या कार्यशाळेला उपस्थित होते. प्रिसिजनच्या दृष्टीने ही मोठी उपलब्धी होती.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र भारूड, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजयकुमार राठोड, महापालिका शिक्षणाधिकारी सुधा साळुंके अशा प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या कार्यशाळेचे उद्घाटन पार पडले. प्रिसिजनचे चेअरमन मा. यतिन शहा आणि प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा या दोघांनीही उपस्थित राहून शिक्षकांशी संवाद साधला.

संदीप गुंड या बहुआयामी तंत्रस्नेही शिक्षकाने ई लर्निंगचा वापर अध्यापनाच्यादृष्टीने कसा करता येईल यावर अत्यंत उद्बोधक आणि समर्पक पध्दतीने मार्गदर्शन केले. फोरटेक सोल्युशन्सच्या विश्वास येळणूरकर यांनी सागा बोर्ड कसा वापरायचा याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांना केवळ ई लर्निंगचे माध्यम पुरेसे नाही. त्यांचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे. मूलभूत लेखन, वाचन, खेळ आणि इतर कौशल्यांचाही विकास व्हायला हवा. डिजिटल माध्यमाचे जसे फायदे आहेत तसेच तोटेही आहेत. म्हणून सर्वांगिण विकासासाठी चाललेले काही अन्य प्रयोगही शिक्षकांसमोर यावेत असा प्रयत्न होता.

लातूर जिल्ह्यातील नांदुरी केंद्राचे प्रमुख कमलाकर सावंत यांनी त्यांच्या केंद्रात केलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. ज्यातून अप्रगत विद्यार्थ्यांचा विकास, शिक्षकांचा ट्रॅकरेकॉर्ड, लोकसहभागासाठी चाललेले विविध प्रयोग याची माहिती त्यांनी दिली. बीड जिल्ह्यातील पारगांव जोगेश्वरी येथिल शिक्षक सोमनाथ वाळके यांनी त्यांच्या शाळेत विद्यार्थ्यांचा बॅण्ड तयार केला आहे. तिथले विद्यार्थी सिंथेसाईझर, ऑक्टोपॅड, तबला अशी सगळी वाद्यं सहजपणे वाजवतात आणि गातातही छान! हा सगळा संगीत प्रकल्प त्यांनी कसा उभा केला याची माहिती त्यांनी



दिली. सोलापूर जिल्ह्यातील कामती येथिल तंत्रस्नेही शिक्षक रोहित उबाळे यांनी पहिली ते चौथीपर्यंतचा सर्व अभ्यासक्रम डिजिटलाईज केला आहे. अभ्यासक्रमात येणारे सर्व संदर्भही विकिपिडियासारखे तिथेच उपलब्ध करून दिले आहेत.

अशा विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती सर्वांना व्हावी यासाठी त्यांचे सादरीकरणही या कार्यशाळेत आयोजिण्यात आले. प्रिसिजनचा दैनंदिन शैक्षणिक गतीविधींशी, तिथल्या वातावरणाशी, अध्यापन कौशल्याशी, शैक्षणिक समस्यांशी तसा संबंध येत नाही. वेगळ्या क्षेत्रात काम करणारी कंपनी असल्याने शैक्षणिक वातावरणाशी परिचित असण्याचा प्रश्नच नाही. पण सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून जेंव्हा एखादा प्रकल्प उभा करायचा असेल तर तो सर्वार्थाने परिपूर्ण असला पाहिजे, या भूमिकेतून प्रिसिजनने हा एक वेगळा पॅटर्न तयार केला.



# आणि सोलार पॅनलची आवश्यकता जाणवली!

पहिल्या ५२ शाळांचे ई लर्निंग कीटचे इन्स्टॉलेशन संपलेले होते. सगळ्या शाळांचं कामकाज व्यवस्थित चालू होतं. प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, प्रा. विलास बेत यांची प्रकल्पातील शाळांना एक संयुक्त भेट आयोजित केली. सोलापूर शहरातल्याच काही शाळा पाहाव्यात या उद्देशाने आम्ही निघालो.
बुधवारचा दिवस होता. एक जिल्हा परिषद, एक महापालिका शाळा आणि एखादी खाजगी शाळा अशा तिन्ही प्रकारच्या शाळांना भेटी देण्याचा मानस होता. पहिल्या शाळेत ई लर्निंगचं कामकाज व्यवस्थित पाहता आलं. दुसऱ्या शाळेत पोहोचेपर्यंत वीज पुरवठा खंडित झालेला होता. पुढच्या दोन्ही शाळांमध्ये ई लर्निंग कीटचं कामकाज पाहाता आलं नाही. 'सोलापूरसारख्या शहरात ही स्थिती आहे तर ग्रामीण भागात वीज पुरवठ्याची काय अवस्था असेल?' 'मग आपण एवढी इन्व्हेस्टमेंट करून जर वीजेमुळे त्याचा वापर होऊ शकत नसेल तर काय उपयोग?' डॉ. सुहासिनी शहांच्या मनात विचार आला, 'आपण सगळ्या शाळांना जर सोलार पॅनल देऊ शकलो तर वीजेचा प्रश्न येणार नाही!' एक चांगली कल्पना एका मोठ्या समस्येला कायमचं उत्तर देऊन गेली!
ई लर्निंगचा प्रोजेक्टर, लॅपटॉप, आय आर कॅमेरा अशी सगळी उपकरणं व्यवस्थित चालायची असतील तर किती क्षमतेची सौर ऊर्जा लागेल ?, त्यासोबत एखादी ट्यूबलाईट, पंखा चालला पाहिजे. संशोधन चालू झाले. त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला घेतला. साधारणतः एक किलोवॅट क्षमता असणारे सौर पॅनल, इन्व्हर्टर लागणार होता. त्यानुसार पुरवठादार एजन्सीचा शोध घेण्यात आला. व्यावसायिक स्तरावरील चर्चा पूर्ण होऊन 'जोगेश्वरी सर्व्हिसेस'ला सोलार पॅनलचे काम सोपवण्यात आले. जोगेश्वरी सर्व्हिसेसचे ओंकार मोडक आणि त्यांच्या टीमने सर्व शाळांमध्ये सोलार पॅनल्स बसवण्याचे काम अत्यंत निष्ठेने आणि काळजीने केले. या सोलार इन्स्टॉलेशनच्या काळात ग्रामीण आणि शहरी शाळांची स्थिती काय, मुलं कशा वातावरणात शिकतात, शिक्षकांची तळमळ, प्रिसिजनने दिलेले योगदान आणि या प्रकल्पाकडे बघण्याचा दृष्टीकोन काय या सगळ्याचा अंदाज त्यांना आला. त्यामुळे सोलार पॅनेलचे काम त्यांनी अधिक तन्मयतेने केले. शिक्षकांशी चांगला संवाद ठेवला. शाळांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ दिली नाही. सर्वच्या सर्व शंभर शाळांचे सोलार पॅनल व्यवस्थित चालतात. ज्या काही अडचणी येतील त्या विनाविलंब सोडवल्या जातात. आपला हेतू चांगला असला की सोबतची टीमही चांगलं काम करते, याचा एक सुखद अनुभव या निमित्ताने घेता आला.



# तोचि दिवाळी दसरा..!

प्रिसिजनने एक मदतीचा हात पुढे केला अन् सोलापूर शहरासह ८२ गावातील १०१ शाळा, ७९० शिक्षक, २०७६९ विद्यार्थी यांच्या चेहऱ्यावर हास्य उमलले.
शिकण्याशिकवण्यातला आनंद अनेक पटीने वाढला. प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्पामुळे सगळ्या शाळांशी, ग्रामीण भागातील शिक्षक, विद्यार्थी आणि गावकऱ्यांशी प्रिसिजनचा एक स्नेहाचा धागा जोडला गेला. प्रिसिजनचे चेअरमन मा. यतिन शहा, डॉ. सुहासिनी शहा, करण शहा, मयुरा शहा आणि संपूर्ण प्रिसिजन परिवाराबद्दल शिक्षकांच्या अन् गावकऱ्यांच्या मनात कृतज्ञता निर्माण होणे स्वाभाविक होते.
'यतिन सरांनी, मॅडमनी आमच्या गावात यावं, शाळेला भेट द्यावी अशी फार इच्छा आहे बघा'... शिक्षकांचा आग्रह वाढू लागला. सगळ्या शाळांना भेटी देणं शक्य नव्हतं. सर फाऊंडेशनचे सिध्दाराम माशाळे आणि बाळासाहेब वाघ यांच्याशी चर्चा करून काही शाळांना भेटी देण्याचं नियोजन केलं. सगळ्या प्रकारच्या शाळा पाहता याव्यात म्हणजे जिल्हा परिषद, महापालिका, खाजगी, लहान शाळा, मोठ्या शाळा, ग्रामीण आणि शहरी, भौतिक सुविधा असलेल्या आणि नसलेल्याही!
सोलापूर शहरालगत असलेली शाळा. नाल्यावर वसलेली. पाचही बाजुंनी पत्रे. पावसाळ्यात साप, विंचुही वर्गात येतील अशी शेटेवस्तीची जिल्हा परिषद शाळा. वस्तीच्या निमुळत्या रस्त्यावरून जात खड्ड्यात डोकावल्याशिवाय ती शाळा दिसतही नाही. मुलांचे चेहरे आनंदाने फुललेले. शिक्षकांच्या चेहऱ्यावर उत्साह मावत नव्हता. काही पालकही नवलाईनं सगळं पाहात होते. मा. यतिन शहा त्या शाळेत प्रवेश करत होते. शिक्षक परवेझ शेख म्हणाले, 'साधू संत येति घरा...तोचि दिवाळी दसरा असं म्हणतात पण तुम्ही आलात हाच आमच्यासाठी दिवाळी दसरा आहे सर!' मुलांनी स्वागतासाठी एकच जल्लोष केला.
इंगोलेवस्ती. मोहोळ तालुक्यातली शाळा. चिखलापाण्यातून वाट काढत त्या शाळेला जावं लागतं. पण शाळेत पोहोचलं की अवघा शीण निघून जावा असा रम्य परिसर. पानाफुलांनी डवरलेला, घनदाट झाडींनी झाकलेला शाळेचा परिसर येणाऱ्यांना पटकन आपलंसं करून टाकतो. मुलांनी हातात एकएक गुलाब फूल देऊन स्वागत केलं. ई लर्निंग कीटवर मुलांचं कामकाज पाहिलं. रवि चव्हाण या कल्पक शिक्षकाने या गावाशी आणि मुलांशी आपुलकीचं नातं निर्माण केलं आहे. त्यामुळे सगळ्या पालकांनी शाळेला उत्सवाचंच स्वरूप आणलं आहे. हातात कॅमेरा, मोबाईल घेऊन काही मुलं फोटोही काढत होते. मा. यतिन शहा यांनी खाली बसून मुलांशी संवाद साधला. त्यांचा हात आपल्या हातात घेण्यासाठी ते चिमुकले हात सरसावत होते. प्रिसिजन म्हणजे काय, यतिन शहा म्हणजे कोण... काहीही माहिती नाही. माहिती असण्याची गरजच नव्हती. पण वर्गात दिसणारा पांढरा पडदा आणि रंगीत सिनेमा



त्यांच्यामुळे मिळाला, एवढंच त्या मुलांना जाणवत होतं. एक अकृत्रिम अनुबंध तयार झालेला होता!

पापरीच्या शाळेत मुलांनी मा. यतिन शहांच्या भोवती गराडा घालत आपल्या वह्या दाखवल्या, हातवारे करत गाणी म्हटली. तिथला फिल्टर्ड पाण्याचा प्लान्ट पाहिला. शाळेने मिळवलेल्या बक्षिसांनी आणि ट्रॉफींनी खोली भरून वाहात होती. मोहोळच्या नगरपालिका शाळेत नगराध्यक्षांनी आणि पालकांनी यतिन शहा यांचा सत्कार घडवत कृतज्ञता व्यक्त केली. सय्यद वरवडेच्या शाळेतही पालकांनी गराडा घातला. मुलांनी भाषणंही केली. कामतीच्या शाळेतील शिक्षकांनी बनवलेला डिजिटल अभ्यासक्रम मा. यतिन शहा यांनी आवर्जून पाहिला. मुलांनी बनवलेल्या अगरबत्ती, उटणे, मेणबत्ती, आकाशकंदिल वगैरेचं त्यांनी कौतुक केलं

मा. करण शहा, मयुरा शहा यांनी सोनामाता, पोखरापूर, मोहोळ अशा वेगवेगळ्या शाळांना भेटी दिल्या. डॉ. सुहासिनी शहा या प्रारंभापासूनच्या प्रत्येक कार्यक्रमाला उपस्थित असल्याने त्यांचा या शिक्षकासमुहाशी अगदी जवळून परिचय झालेलाच आहे.

या प्रकल्पाच्या निमित्ताने प्रिसिजनच्या उच्चस्तरीय व्यवस्थापनाचा एका मोठ्या लोकसमुहाशी थेट संपर्क निर्माण झाला. 'सामाजिक उत्तरदायित्व निधी' समाजासाठी खर्च करणे ही केवळ कायदेशीर पूर्तता न राहाता त्याला आपलेपणाचा स्पर्श झाला. सीएसआरचं केवळ कायदेशीर कर्मकांड पूर्ण करणं एवढ्यापुरतंच मर्यादित न राहाता त्याला विकासात्मक दृष्टीची जोड मिळाली!




# राजस्थान शिक्षण विभागाची भेट

प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्पाला राजस्थान सरकारच्या शिक्षण विभागाच्या शिष्टमंडळानेही भेट दिली. या पथकात शिक्षण विभागाच्या सहसंचालक नूतन कपिला यांच्यासह उच्चस्तरीय अधिकारी वर्गाचाही समावेश होता.

प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्पातील जि. प. प्राथमिक शाळा शेटेवस्ती, लोकूतांडा, सोरेगाव (ता. उत्तर सोलापूर), इंगोले वस्ती (ता. मोहोळ) या शाळांमधील विद्यार्थ्यांशी शिष्टमंडळाने संवाद साधला. इंटरॲक्टिव्ह बोर्ड, टॅब, लॅपटॉप वापरासंबंधी विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक त्यांनी पाहिले. डिजिटल लर्निंगबद्दल विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी अचूक उत्तरे दिली. जि. प. प्राथमिक शाळा सोरेगाव येथील तंत्रस्नेही शिक्षक रणजितसिंह डिसले यांनी बालभारतीच्या पाठ्यपुस्तकात क्यूआर कोडचा व्हर्चुअल ट्रिप संकल्पनेचा अध्यापनात वापर यावर सादरीकरण केले.

या संपूर्ण प्रकल्पाचे राजस्थान शिक्षण विभागाच्या शिष्टमंडळाने कौतुक केले. ई लर्निंगमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून भाषा व गणित आदी विषयांचे अध्यापन सुकर झाले. विद्यार्थ्यांची उपस्थिती व त्यांची गुणवत्ता दोन्हीही वाढली, असे निरीक्षण या शिष्टमंडळाने नोंदवले. एक प्रकारे प्रिसिजनचा ई लर्निंग प्रकल्प हा सोलापूर पॅटर्न म्हणून देशभरात उदयाला येऊ शकतो हेच या भेटीवरून स्पष्ट झाले.



# आय.आय.एम. अहमदाबाद टीमची भेट

प्रिसिजनच्या ई लर्निंग प्रकल्पाची दळल इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अहमदाबादनेही घेतली. आय.आय.एम. अहमदाबादच्या रवी जे मथाई सेंटर फॉर एज्युकेशनल इनोव्हेशनच्या टीमने या प्रकल्पातील काही शाळांची पाहणी केली.
आय.आय.एम.चे रिसर्च असोसिएट मेघा गज्जर, संकेत सावलिया, कौशिक अभिवाडकर, अजयकुमार गुप्ता यांचे शिष्टमंडळ सोलापूरात येऊन गेले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचे चित्र लोकसहभागातून बदलून दाखविल्याबद्दल या शिष्टमंडळाने कौतुक केले. चाईल्ड थिएटर ही कल्पना त्यांना फारच आवडली.

सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची व विद्यार्थ्यांची झालेली प्रगती हा अभ्यासाचा विषय झाल्याचे त्यांनी नमूद केले. सोलापूर जिल्ह्यातील शैक्षणिक प्रगतीचा आलेख उत्तम असल्याची नोंद त्यांनी केली. तसेच, सामाजिक संस्था आणि कॉर्पोरेट कंपन्या एकत्र आल्यास शिक्षणव्यवस्थेतील चित्र कसे बदलू शकते याचे प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्प हे उत्तम उदाहरण असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.



# जि. प. सीईओंनी साधला ई-संवाद

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र भारूड यांनी प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्पातील शाळांमधील विद्यार्थ्यांशी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून संवाद साधला. माझी चिमणी पाखरं असं या उपक्रमाचं नाव होतं. सोशल मिडीयाचा वापर करून विद्यार्थ्यांशी संवाद साधणारे डॉ. भारूड हे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी ठरले. विद्यार्थ्यांसोबतच शिक्षकांमध्येही या उपक्रमाची उत्सुकता दिसून आली. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण मोहोळ तालुक्याती पापरी, खंडाळी, इंगोले वस्ती या शाळेतील विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी मोबाईलवर डॉ. भारूड यांच्याशी संवाद साधला.

असाच ई-संवादाचा प्रयोग अमेरिकास्थित पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. संगीता तोडमल यांनी केला. त्यांनी फेसबुक व्हिडीओ कॉलद्वारे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधला. अत्याधुनिक साधनांचा वापर करून परदेशातील व्यक्तीशी बोलण्याच्या या अनुभवामुळे विद्यार्थी आणि पालक हरखून गेले.

समाज आणि पर्यावरणाकडून जे काही मिळाले त्याची परतफेड करण्याच्या उद्देशाने सीएसआर अंतर्गत समाजातील विविध क्षेत्रांमध्ये प्रिसिजन समूह निरंतर कार्यरत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही काळानुरूप व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे या हेतूने प्रिसिजनने १०० पेक्षा अधिक शाळा इंटरॲक्टिव्ह डिजिटल केल्या. या शाळा आज महाराष्ट्रालाच नव्हे तर पूर्ण देशाला डिजिटल शिक्षणासाठी दिशादर्शक व प्रेरणादायी ठरत आहेत.
डिजिटल स्कूल अभियानाअंतर्गत काम करत असताना अनेक कंपन्यांशी माझा संपर्क आला. त्यांना सीएसआर अंतर्गत डिजिटल स्कूल संकल्पना राबविण्यासाठी मदत केली. केवळ नियमाचे पालन करायचे म्हणून सीएसआर करणाऱ्या कंपन्यांकडून शाळांना पुरविलेल्या साहित्याची मोठी यादी दाखविली जाते. शाळांपर्यंत साधने पोहोचविल्यानंतर पुन्हा त्याकडे ढूंकूनही पाहिले जात नाही. त्यामुळे गुणवत्तावाढ होत नाही. मात्र प्रिसिजन याला अपवाद आहे. केवळ ई लर्निंगचे सांगाडे उभे करणे एवढेच प्रिसिनला अपेक्षित नव्हते.
ई लर्निंग प्रकल्प सुरू करण्यापूर्वी प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांनी पाष्टेपाडा येथील माझ्या शाळेला भेट देऊन ती संकल्पना समजावून घेतली. डिजिटल शाळेसाठी आवश्यक इंटरॲक्टिव्ह साधनांची निवड, सर फाऊंडेशनच्या मदतीने सर्व्हे करून शाळांची निवड, ई लर्निंग किट हाताळण्यासंदर्भात शिक्षकांना प्रेरणादायी प्रशिक्षण, केस स्टडीजच्या माध्यमातून शाळांमध्ये होत असलेल्या बदलांचे मूल्यमापन... ही सर्व प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध आणि अभ्यासपूर्वकपणे राबविल्यानेच या प्रकल्पाचे उद्दिष्ट सफल होत असल्याचे दिसून येत आहे.
शाळांसाठी सीएसआर निधी खर्च करण्यासाठीचे धोरण बनविताना शाळांचे प्रश्न, त्यांच्या गरजा आणि अपेक्षा समजून घेऊन काम केल्यास अपेक्षित बदल दिसू शकतात, हे प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्पातून अधोरेखित झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्तावाढ साधणाऱ्या एका सुंदर प्रकल्पामध्ये काम करण्याची संधी दिल्याबद्दल प्रिसिजन समूहाचे मनःपूर्वक आभार...

**संदीप गुंड**
**सल्लागार, ऑपरेशन डिजिटल बोर्ड, भारत सरकार**

---

मोहोळ तालुक्यातील पेनूर गावातील तामडागची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा. गुणवत्तेच्या बाबतीत थोडीशी पाठीमागे असणारी ही शाळा प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्पात सहभागी झाल्यापासून प्रगत झाली आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र उपक्रमाअंतर्गत शाळा १०० टक्के प्रगत झाली आहे. याचे पूर्ण श्रेय प्रिसिजन समूहाला जाते. शाळेचा पट ६३ वरून १२३ वर पोहोचला आहे. प्रिसिजन समूहाने केलेल्या मदतीचा प्रभाव ग्रामस्थांवरही पडला. याचा फायदा होऊन शाळेत लोकवर्गणीतून आजपर्यंत तीन लाख रूपयांची विकासकामे झाली. शाळेचे रूप पालटले. शाळेविषयीची नकारात्मकता संपली. अध्यापन प्रभावी करण्यात शिक्षकांना यश आले. विद्यार्थ्यांचे शंका निरसन करणे सोपे झाले.

**संजय पवार**
**जि. प. प्राथमिक शाळा तामडाग, पेनूर, ता. मोहोळ**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या या युगात विद्यार्थ्यांनी फक्त पुस्तकी ज्ञानावरच अवलंबून न राहता, संगणकीय ज्ञानाचाही उपयोग केला पाहिजे. संगणकाच्या वापरामुळे अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया अतिशय सुलभ झाली आहे. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रिसिजनकडून मिळालेल्या ई लर्निंग किटमुळं शाळा डिजिटल झाली. ई लर्निंग कक्षात केवळ विद्यार्थीच नव्हे तर शिक्षकही रमले. विद्यार्थ्यांना शाळा आवडायला लागली. शाळेची पटसंख्या आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती दोन्हीही वाढली. ई लर्निंगमुळं शिक्षकांना शिकविण्यासाठी क्लिष्ट असणारे अध्यापनाचे घटक सोप्या पद्धतीने शिकविणे शक्य झाले. शिक्षक आणि विद्यार्थी दोघांचाही आत्मविश्वास वाढला.

**धर्मा दराडे**
**मुख्याध्यापक, गजानन महाराज विद्यामंदीर, स्वागतनगर, सोलापूर**

---

प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्पाअंतर्गत शेटेवस्ती जि. प. प्राथमिक शाळेलाही ई लर्निंग किट मिळाले. इंटरॲक्टिव्ह स्मार्ट बोर्डवर मुलांना प्रत्यक्ष सराव करून डिजिटल शिक्षणाचा अनुभव घेता आला. इलेक्ट्रिक पेनचा वापर करून मुलं सॉफ्टवेअरच्या सहाय्याने गणिती क्रिया, चित्रकला, ई लायब्ररी आदींचा सराव करू लागली. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तसेच विविध व्हिडिओ, पीपीटी, एक्सेलचा वापर करून डिजिटल अध्यापन केले. विविध ॲप्सचा वापर करून मुलांना शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू झाला.

**परवेज शेख**
**जि. प. प्राथमिक शाळा शेटेवस्ती, सोलापूर**

प्रिसिजन समूहाने दिलेल्या ई लर्निंग किटचा अनुभव खूपच उत्साहवर्धक, रोमांचक होता. दिवसभराच्या बोलण्याने जे साध्य होत नव्हते ते स्मार्ट बोर्डमुळे सहज होऊ लागले. विद्यार्थ्यांना सगळेच विषय सोपे, आनंददायी वाटू लागले. गुणवत्तेचा आलेख वाढायला लागला. इंग्लिश मिडियमचे विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेऊ लागले. सोलार पॅनलमुळे ई लर्निंग किट विनाव्यत्यय वापरता येऊ लागले. या किटने सोलापूर जिल्हा जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये एक क्रांतीच घडवून आणली.

**कविता फुटाणे**
**जि.प.शाळा बोरामणी, ता. दक्षिण सोलापूर**

# ई लर्निंग प्रकल्पातील शाळांची तालुकानिहाय यादी (कंसात पटसंख्या)




**सोलापूर शहर (२०)**

श्री समर्थ विद्यामंदिर शास्त्रीनगर (७०१), सोनामाता विद्यालय लिमयेवाडी (२६२), मनपा मराठी केंद्र शाळा क्र.४ (२०१), मनपा शाळा क्र. २८ (६५), मनपा मुलांची मराठी शाळा क्र. २५ (७५), मनपा मुलींची शाळा क्र. १० (९१), साने गुरूजी प्राथमिक शाळा (६५०), वोरोनोको प्राथमिक शाळा (१००), नवीन मराठी शाळा (१०६), जि. प. प्राथमिक शाळा बाळे (२०१), जि. प. प्राथमिक शाळा अंबिका नगर बाळे (१६६), मनपा मुलांची कँप शाळा (१७५), मनपा डीएसके शाळा विनायक नगर (१५०), मनपा मुलांची शाळा क्र. २ (१२२), जि. प. प्राथमिक शाळा शेळगी (११३), गजानन महाराज प्राथमिक शाळा (३३९), कमला नेहरू प्राथमिक शाळा (१०६), सोनामाता विद्यालय मोदी (३९१), ज्ञानगंगा प्राथमिक शाळा (३०८), सरस्वती मंदिर ()

**मोहोळ तालुका (१२)**

जि. प. प्राथमिक शाळा क्रमांक ४ मोहोळ (१४०), जि. प. प्राथमिक शाळा, पोखरापूर (३१२), जि. प. प्राथमिक शाळा, तामडाग (१२३), जि. प. प्राथमिक शाळा, इंगोलेवस्ती (९१), जि. प. प्राथमिक शाळा, पापरी (६४९), जि. प. प्राथमिक शाळा, सय्यद वरवडे (३१८), जि. प. प्राथमिक शाळा, कामती (१७५), जि. प. प्राथमिक शाळा, पाटकूल, सातपुते वस्ती (१३०), जि. प. प्राथमिक शाळा, अष्टे (१८८), जि. प. प्राथमिक शाळा, खुनेश्वर (२५७), जि. प. प्राथमिक शाळा, बोपळे (१३८), जि. प. प्राथमिक शाळा, चिंचोळी काटी (४०३)

**अक्कलकोट तालुका (११)**

जि. प. प्राथमिक शाळा दर्गनहळ्ळी (२६६), जि. प. प्राथमिक शाळा कोन्हाळी (१५७), जि. प. प्राथमिक शाळा, बॅगेहळ्ळी (९३), जि. प. प्राथमिक शाळा जेऊर (२१३), जि. प. प्राथमिक शाळा आचेगांव (२१७), जि. प. प्राथमिक शाळा बबलाद (१४५), जि. प. प्राथमिक शाळा हालहळ्ळी (५०), जि. प. प्राथमिक शाळा सांगवी (२४०), जि. प. प्राथमिक शाळा अक्कलकोट स्टेशन (१६१), जि. प. प्राथमिक शाळा सातनदुधनी (२३३), शारदामाता इंग्रजी शाळा शिवपुरी ()

**उत्तर सोलापूर तालुका (२०)**

जि. प. प्राथमिक शाळा मार्कंडेयनगर (१६२), जि. प. प्राथमिक शाळा मजरेवाडी (१६५), जि. प. प्राथमिक शाळा लोकूतांडा (३०), जि. प. प्राथमिक शाळा शेटेवस्ती (३३), जि. प. प्राथमिक शाळा शिवणी (९६), जि. प. प्राथमिक उर्दू शाळा विडी घरकूल कुंभारी (२३५), जि. प. प्राथमिक शाळा टिकेकरवाडी, जि. प. प्राथमिक शाळा पडसाळी (१७५), जि. प. प्राथमिक शाळा बेलाटी (२१६), जि. प. प्राथमिक शाळा तरटगांव (१७), श्री स्वामी समर्थ विद्या विकास प्राथमिक शाळा कुंभारी (११), सावित्री कन्या प्रशाला रानमसले (११०), जि. प. प्राथमिक शाळा तळेहिप्परगे (२७३), जि. प. प्राथमिक शाळा कवठे (२०१), जि. प. प्राथमिक शाळा कोंडी (२७७), जि. प. प्राथमिक शाळा कारंबा (१८५), जि. प. प्राथमिक शाळा नरोटेवाडी (१८४), जि. प. प्राथमिक मराठी शाळा विडी घरकूल (१६४), जि. प. प्राथमिक शाळा राळेरास (७१), जि. प. प्राथमिक शाळा हगलूर (७८)

---

**दक्षिण सोलापूर तालुका (२७)**

जि. प. प्राथमिक कन्नड शाळा टाकळी (२०२), जि. प. प्राथमिक शाळा बरूर (४८), जि. प. प्राथमिक मराठी केंद्र शाळा बरूर (२११), जि. प. प्राथमिक शाळा माळकवठे (२५१), जि. प. प्राथमिक शाळा कुसूर (३२०), जि. प. प्राथमिक शाळा वडापूर (२५४), जि. प. प्राथमिक शाळा येळेगांव (२३३), जि. प. प्राथमिक शाळा अकोले (१३१), जि. प. प्राथमिक शाळा तीर्थ सोलापूर (१५२), जि. प. प्राथमिक कन्नड शाळा तीर्थ (२८), जि. प. प्राथमिक शाळा वरळेगांव (९७), जि. प. प्राथमिक शाळा वडजी (१८४), जि. प. प्राथमिक शाळा कासेगांव (२२४), जि. प. प्राथमिक शाळा, शिंगडगांव (१३२), जि. प. प्राथमिक शाळा बंकलगी (१०३), जि. प. प्राथमिक शाळा संगदरी (२१०), जि. प. प्राथमिक शाळा चिंचपूर (१२४), जि. प. प्राथमिक शाळा बोळकवठा (१३५), जि. प. प्राथमिक मराठी शाळा टाकळी (२०९), जि. प. प्राथमिक शाळा औराद (१८८), जि. प. प्राथमिक शाळा सोरेगांव (३७८), जि. प. प्राथमिक शाळा बोरामणी (३५४), जि. प. प्राथमिक शाळा मोहोळकर वस्ती (३८), जि. प. प्राथमिक शाळा बक्षी हिप्परगे (१८५), जि. प. प्राथमिक मुलींची शाळा कंदलगांव (१६२), जि. प. प्राथमिक मुलांची शाळा मंद्रूप (२५१), जि. प. प्राथमिक शाळा कणबस (२५६)

---

**माढा तालुका (५)**

जि. प. प्राथमिक शाळा तुळशी (३७८), जि. प. प्राथमिक शाळा व्होळे (१४४), जि. प. प्राथमिक शाळा सुर्ली (१२४), जि. प. प्राथमिक शाळा अरण (४१०), जि. प. प्राथमिक शाळा मोडनिंब (४२५)

---

**मंगळवेढा तालुका (२)**

जि. प. प्राथमिक शाळा माचणूर (६९), जि. प. प्राथमिक शाळा मरवडे (२२८)

---

**उस्मानाबाद जिल्हा (२)**

जि. प. प्राथमिक शाळा धोत्री (१३६), जि. प. प्राथमिक शाळा खडकी (१८४)

---

**बीड जिल्हा (१)**

जि. प. प्राथमिक शाळा पारगांव-जोगेश्वरी आष्टी ()

---

**कोल्हापूर जिल्हा (१)**

कै. शंकरराव नाडगोंडे विद्यामंदिर गडहिंग्लज ()

# काही बोलके क्षण













# काही बोलके क्षण
















# काही बोलके क्षण






Precision E-Learning Project






Teachers Training Programme
SR Foundation




PRECISION
FOUNDATION

गावे ८२

शाळा १०१

शिक्षक ७९०

विद्यार्थी २०,७६९